। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २६७ वा । शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# लातूर महानगरपालिकेत काँग्रेसची बहुमताने सत्ता!

## काँग्रेसचे ४३ तर वंचित ४ असे ४७ तर भाजपा २२ व राष्ट्रवादी (अजित पवार गट) १ विजयी



**लातूर/प्रतिनिधी : राज्याचे लक्ष लागलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत निर्वादीतपणे काँग्रेस पक्षाने बहुमत मिळवण्यात यश मिळाले आहे. काँग्रेस पक्षाचे ४३ उमेदवार विजयी झाले, वंचितचे ४ उमेदवार विजयी झाले. काँग्रेस व वंचित यांची लातुरात आघाडी होती. यावेळी भाजपाचे २२ उमेदवार विजयी झाले तर अजित पवार गट राष्ट्रवादीने एका जागेवर समाधान मानावे लागले.**

ज्यावेळी लातूर शहर महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली. त्यावेळी भाजपाला चांगले यश मिळेल असे वाटत होते. तसे सकारात्मक वारे वाहत असताना भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी जे वक्तव्य केले त्यामुळे बदलाचे वारे वाहू लागले'विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील' या एका वाक्याने भाजपाविरोधात वातावरण वाहू लागले आणि याचाच फायदा काँग्रेसला मिळाला. विद्यमान काँग्रेसचे आमदार माजी मंत्री अमित देशमुख यांनी वंचित बहुजन पार्टीशी आघाडी करून जे परिश्रम घेतले त्याचा फायदा काँग्रेसला मिळाला आहे. या निवडणुकीत निलंग्याचे माजी मंत्री व आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हाती प्रचाराची सुत्रे दिली. वास्तविक सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना बाजूला केले, हा दुसरा परिणाम लातुरात झाल्याचे सर्रास बोलले जात आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी सभा झाली तरीही राष्ट्रवादीला एका जागेवर विजय मिळवता आला. विक्रांत गोजमगुंडे हे पुर्वीचे काँग्रेसचेच कार्यकर्ते होते त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. लातूर जिल्ह्यात अजित पवार राष्ट्रवादी पार्टीचे माजी मंत्री व आमदार संजय बनसोडे व बाबासाहेब पाटील मंत्री असताना केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले आहे.



लातूर जिल्ह्यात आमदार व माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर, औशाचे आमदार अभिमन्यू पवार, ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड यांनी यावेळी मोठे परिश्रम घेतले. लातूरमध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सह बावनकुळे आदी मान्यवरांच्या सभा झाल्या असताना लातूरकरांनी भाजपाला नाकारले याकडे दुर्लक्ष करता येत नाही. भाजपाने आत्मपरीक्षण केले पाहिजे, असा विचार निष्ठावंत भाजपा कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## मुंबईत ठाकरे बंधूंना मोठा धक्का? भाजपा-शिंदे सेनेची आघाडी

**भाजपा-९२, शिंदे सेना २६ तर ठाकरे सेनेची ६० जागांवर आघाडी**



मुंबई, ठाण्यासह राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान पार पडलं, त्यानंतर आज (१६ जानेवारी) निवडणुकीचे निकाल जाहीर होत आहेत. महापालिका निवडणुकीच्या निवडणुकींपैकी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीची राज्यात चर्चा झाली. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणुकीच्या निकालाकडे राज्याचं लक्ष लागलेलं होतं. मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी निवडणूक पार पडली. दरम्यान मुंबईचा महापौर कोणाच्या पक्षाचा होणार? मुंबईचा महापौर भाजपा-सेना युतीचा होणार की ठाकरे बंधूंच्या युतीचा होणार किंवा आणखी दुसऱ्या पक्षाचा होणार? याकडे मुंबई करांचं लक्ष लागलं आहे. मुंबईत भाजपा-शिंदे सेना युतीने मोठी आघाडी घेतली असून ठाकरे बंधूंना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

## भारतीय सेना दिनानिमित्त लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील एनसीसी कॅडेटच्या वतीने कॅप्टन कृष्णकांत यांना मानवंदना




**उदगीर/प्रतिनिधी :** १५ जानेवारी रोजी उदगीर शहरातील लाल बहादूर शास्त्री विद्यालय व छत्रपती सैनिकी विद्यालय उदगीर यांच्या वतीने शहीद कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली

याप्रसंगी उदगीर शहराचे तहसीलदार राम बोरगावकर,छत्रपती सैनिकी विद्यालयाचे उपाध्यक्ष .चंदन पाटील नागराळकर, छत्रपती सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य कुलकर्णी एनसीसी विभाग प्रमुख बालाजी मुस्कावाड व लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार एनसीसी विभाग प्रमुख विष्णू तेलंग व एनसीसी कॅडेट उपस्थित होते.

## जळकोट तालुक्याला अवकाळीचा तडाखा

### पावसामुळे आंब्यांसह फळबागा व रब्बी पिकांचे नुकसान

**जळकोट/प्रतिनिधी :** पावसाळ्यात सुनामीसारख्या आलेल्या अतिवृष्टी व ढगफुटीने खरीप हंगामातील पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले होते. आता हंगामात अवकाळी पावसाने पुन्हा हजेरी लावून १४ जानेवारी रोजी सायंकाळी जळकोट तालुक्यात धुमाकूळ घातला. धो धो पावसामुळे जबरदस्त बसलेल्या फटक्याने गावरान व केशर आंब्यासह फळबागा, भाजीपाला व रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याचे वृत्त आहे.



हवामान बदलाची परिस्थिची जळकोट तालुक्यातील केशर आंबा उत्पादक शेतक-यांच्या मूळावर उठली आहे.१४ रोजी सायंकाळी अचानक धो धो स्वरुपात कोसळलेल्या अवकाळी पावसाने जळकोट शिवारातील केशर आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या पावसामुळे सुवर्णा गिरीराम डुमणे या महिला शेतक-याच्या जळकोट येथील गट नंबर १०९५ मधील १ हेक्टर ७६ आर केशर आंब्याच्या बागेचे प्रचंड नुकसान झाले आहे. केशर आंब्याला मोठ्या प्रमाणात तोर आला असून फळधारणा सुरु होऊन झाडे आंबा फळाने बहरली होती. तथापि, अचानक आलेल्या अवकाळी पावसाने फळ गळती होऊन सुवर्णा डुमणे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

त्यामुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी सुवर्णा डुमणे यांनी केली आहे. याबरोबरच जळकोट शहरास तालुक्यातील अनेक गावांतील अनेक शेतकऱ्यांचे केशर आंबा, गावरान आंबा, चिंच या फळांचे नुकसान झाले आहे. तसेच गहू, भाजीपाला, तूर, ज्वारी यांचे नुकसान झाले असून या सर्व नुकसानीची पाहणी करून तातडीने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी तालुक्यातील आपद्ग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.


## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**जानेवारीपासून अमेरिकेची दारे बंद ! ७५ देशासाठी व्हिसा प्रक्रिया रोखली...**

## चिमटा दयाचा



महानगरपालिकेच्या निवडणूक निकालानंतर जि.प.कडे लक्ष लागले आहे ! आतापासून कार्यकर्ते फिल्डींग लावत आहेत!!

## पुलाला धडकून कार पेटल्याने शिक्षकाचा मृत्यू

### अहमदपूर तालुक्यातील काजळ हिप्परगाची घटना



**अहमदपूर/प्रतिनिधी:** प्रकृती अस्वास्थ्यामुळे शाळेतून घरी जात असलेल्या शिक्षकाची कार पुलाच्या कठड्याला धडकताच पेटली. यात जिल्हा परिषद शिक्षकाचा होरपळून मृत्यू झाला. गुरुवारी (१५ जानेवारी) सकाळी अहमदपूर - अंबाजोगाई महामार्गावरील काजळ हिप्परगा पाटीजवळ ही घटना घडली. माधव बाबुराव श्रीवाड (५०, रा. कोळवाडी, ता. अहमदपूर) असे मृत शिक्षकाचे नाव आहे. श्रीवाड हे अहमदपूर तालुक्यातील कोपदेव हिप्परगा जि.प.शाळेत शिक्षक होते.

सकाळी ९ वाजता अहमदपूर येथून ते शाळेत गेले होते. प्रकृती बिघडल्याने ते स्वतः कार घेऊन अहमदपूरकडे निघाले असता त्यांची कार पुलाच्या कठड्याला धडकून तिला आग लागली. मात्र त्यांना बाहेर पडता आले नाही आणि होरपळून त्यांचा मृत्यू झाला. नागरिकांनी अग्निशमन विभागास माहिती दिल्यानंतर आग विझविण्यात आली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

**इंजिनचा आवाज जास्त होता**

माधव श्रीवाड शाळा अर्धवट सोडून घरी परत निघाले असताना वाटेत काजळ हिप्परगा पाटीजवळ त्यांची 'मारुती ८००' कारच्या इंजिनचा मोठा आवाज आल्याने तेथे थांबलेल्या लोकांनी पाहिले. पुढे गेल्यानंतर कार पुलाच्या कठड्यावर धडकली .पेट घेतला. आग भडकल्याने बाहेर पडू शकले नाही.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## लोकशाहीत काय घडत आहे..?

नुकत्याच नगरपरिषद व महानगरपालिकेच्या निवडणुक मतदान पार पडले, यावेळी जे जाहीर प्रकार पाहिल्यावर लोकशाहीत काय घडत आहे यावर मन चिंतेत होणे स्वाभाविक आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत कमी वेळ मिळाला असला तरी प्रत्यक्षात जे या काळात घडले व एकावयास आले ते चिंताजनक आहे. मुळात लोकशाहीसाठी नागरिक पात्र आहोत का नाही या बाबत चिंतनाबरोबर मन मंत्रमुग्ध होत आहे. असा प्रकार यापुर्वी महाराष्ट्रात दिसून येत नव्हता, निवडणुका ह्या लोकशिक्षणाचे काम करतात. त्याच प्रमाणे आपले प्रतिनिधी पाठविण्याची संधी लोकशाहीने दिलेली असते. त्यानुसार मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, तो अनेकांनी बजावला आहे. या बाबत जागृती ही चांगल्या प्रकारे झाली होती. प्रचार, हक्क समजावताना गैरप्रकार होत असतील तर चालू न देणे ही नागरिक मतदाराची जबाबदारी आहे. मतदार नागरिकांनी कोणाच्याही दबाबवाखाली मतदान करू नये असे आवाहन केले जाते. तरीही जे प्रकार मतदानपुर्व दिसून आला तो न आवडणारा होता. काही तक्रार ही पोलिस स्टेशनमध्ये गेल्या. पोलिस स्टेशनमध्ये कार्यकर्ते गैरप्रकारावर आळा घाला म्हणून ठिय्या करताना दिसून आले. आलिकडे मोबाईलवरून फेसबुकच्या माध्यमातून जे चित्र पाहावयास मिळाले त्यामुळे आपला बिहार किंवा प. बांगला तर झाला नाही ना अशी शंका निर्माण झाली. विचार करायाला लावणारी घटना घडत आहेत. पुर्वी काही चुकीचे प्रकार केवळ चित्रपटात पाहिले आहेत. प्रत्यक्षात पाहिल्यावर मतीगुंग झाल्याशिवाय राहात नाही. लोकशाहीत प्रचार करावा मात्र यात अतिरेक होता कामा नये. गुंडगिरी होता कामा नये, ती जर दिसून आली तर लोकशाही धोक्यात आली ? असे म्हणावयाचे का? त्यामुळे देशातील हीतचिंतकांनी विचार केला पाहिजे. मुंबई व पुण्यात मतदानाच्यावेळी काही प्रकार पाहिला. राज ठाकरे यांनी टिका केली तर काही मतदार बंधूंनी बोटावर लावलेली शाई पुसून जात असल्याचे सांगितले. ही योग्य नसल्याचा खुलासा केला व गुन्हा सुद्धा दाखल केल्याचे समजते, यात किती तथ्य आहे हा संशोधनाचा विषय असला तरी ज्या काही तक्रारी असतील त्याचे निरसण करून पुन्हा असे प्रकार होणार नाही. तक्रार निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. कितीतरी सावधपने निवडणुक आयोग काम करीत असताना दिसून येतो. कडक आचारसंहीता पाळली जाते. सर्वजनच लोकशाहीचा आदर करून निवडणुक आयोगाच्या सुचनाचे पालन करीत असतात. तरी साड्या वाटत असो किंवा पैसा वाटपाबाबत दबक्या आवाज बाहेर येत असेल तर त्यातील त्रुटी, चुका सुधारल्या पाहिजेत. नगरपरिषदा व महानगरपालिकेचे मतदान झाले. आता जिल्हापरिषदा व पंचायत समितीची आचारसंहीता लागू करण्यात आली. त्यात ज्या त्रुटी व चुका राहील्या त्या सोडविल्या पाहिजेत. त्या जिल्हापरिषदेच्या निवडणुक मतदानावेळी होवू नयेत. त्यामुळे मतदानाच्यावेळी त्रुटी आढळून आल्या त्या सुधारल्या पाहिजेत. वास्तविक एक विचार समोर येतो. ही परप्रांतीय बाब किंवा संस्कृती महाराष्ट्रात शिरली कशी? पैसा किंवा साड्या वाटप बाबतची संस्कृती महाराष्ट्राची नाही. महाराष्ट्रात पुर्वी सत्तांतर कोणी करत नसत. डावे किंवा शेका पक्षातील आमदारांना मंत्रीपदाचे अमिष दाखविले तरी ते पक्ष सोडत नसत एवढी पक्षनिष्ठा होती. कार्यकर्ते प्रामाणिक होते. पक्षबदलूपना नव्हता. मतासाठी गैरप्रकार अजिबात दिसून येत नव्हता. अतिषय काटेकोरपने लोकशाहीचे जतन होत होते. असे असताना यावेळी सोशलमिडीयावर जो गैरप्रकार दाखविला यावर चिंतन होणे आवश्यक आहे. काही राजकिय पक्ष अशा खालच्या स्तरावर पोंहचतील असे स्वप्नात देखिल वाटत नव्हते. असा प्रकार सोशलमिडीयावर यावेळी दिसून आला. वास्तविक प्रामाणिक काम केले, सेवा केली तर मतदार निश्चित स्विकारतील. काम न करता गैरमार्गाने विजयी होवू ही संकल्पना लोकशाहीला धरून नाही. मतदारांची मानसिकता सुद्धा यावेळी बदललेली दिसून आली. मतदारांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्या चुकीच्यामार्गाचा आवलंब करणाऱ्या असतील तर ते योग्य नाही. त्यामुळे निवडणुका म्हटली की, पैसा आला. असे जे सुत्र दिसून येत आहे ते कोठे तरी व कोणीतरी थांबविले पाहिजे. पैसा व साड्या कशासाठी? त्यामुळे प्रामाणिक व निष्ठावंत मागे राहाताना दिसून येत आहेत. समाजात चांगली माणसे पुढे आले तरच समाज सुधारेल व चांगले परिवर्तन होवू शकेल. चुकीच्या मार्गाचा आवलंब करून सेवक बनत असतील तर ते योग्य नाही. यदाकदाचित लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता आहे. लोकशाही जिवंत व वृद्धींगत ठेवण्यासाठीची जबाबदार मतदार नागरिकांची गरज आहे. जगाच्या पाठीवर कोठेही जा. भारताएवढी लोकशाही कोठेही दिसून येणार नाही. चुकीचा मार्गक्रम होत असेल तर ते रोखण्याचे काम जनतेचे आहे. जनता सुधारू शकते. लोकशाहीत नागरिक मतदाराच्या हाती मोठी ताकद आहे. त्यात गैरप्रकार नको. एकतर कार्यकर्त्यास मारहाण करताना व्हीडीओ व्हायलर झाला, कारण तो काही तरी पिशवीतून वाटप करीत होत असल्याचा संशय निर्माण झाल्याने दिसून आला. नेते किंवा कार्यकर्त्याच्या गाडीतून रोकड जप्त होताना दिसून येत आली तर कोणास नावे ठेवावे हा प्रश्न समोर उभा राहातो. जे लोकशाहीत चुकीचे आहे त्याच आवलंब करू नये. कशासाठी चुकीचा मार्ग आवलंबल यावेळी झाला. गरज नसताना चुकीची पद्धत रुढ होता कामा नये. या बाबत सरकारने काही कठोर निर्णयाची गरज आहे. गैरप्रकाराने मत घेणे हे अयोग्य आहे. त्यामुळे चुकीचा आवलंब होत असेल तर ते रोखले पाहिजेत. या बाबत कडक नियमावलीची गरज आहे. वास्तविक सर्वच राजकिय पक्षाचे व अपक्षाचे मंडळी आपले नशीब आजमावते. ते चुकीचे नाही. मात्र यात गैर प्रकार होत असेल तर तो खपवून घेवू नये, जे चुकीचे आहे ते चुकीचे आहे हे सांगण्याचे धाडस केले पाहिजे. गैर प्रकार करताना धाडस चुकीचे आहे. तसे धाडस चांगल्या प्रकारात असणे आवश्यक आहे. मुळात यावेळी अतिषय दु:खदायक बाबी दिसून आल्या. लोकशाहीला मारक बाबी दिसून आल्या. त्या यापुढे दिसून येवू नये. चुकीच्या बाबीचा शिरकाव होवू नये एवढी जबाबदारी आता यापुढे घेणे आवश्यक आहे.

# हिंद दी चादरः श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्याग आणि बलिदानाची अमर गाथा

मानवतेच्या इतिहासात काही अशी व्यक्तिमत्वे होऊन गेली, ज्यांनी केवळ स्वतः च्या धर्मासाठी नव्हे, तर दुसऱ्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी आणि मानवाधिकारांसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. शिखांचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी हे त्यापैकीच एक महान युगपुरुष आहेत. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्या अतुलनीय बलिदानाचे स्मरण करणे, हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. ''हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग आणि ''हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी ३५० वी शहिदी समागम शताब्दी राज्यस्तरीय समिती'', शीख- सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंधी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

श्री गुरु तेग बहादुर हे शिख धर्माचे ९ वे गुरू होते, त्यांना हिंद दी चादर म्हणून ओळखले जाते. श्री गुरु तेग बहादुर यांनी शिख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्त्व आणि निर्भीडपणा यांचा प्रचार केला, त्यांचे प्रवचन व भजन यांचा ''गुरु ग्रंथ साहिब'' यामध्ये देखील समावेश आहे. श्री गुरु तेग बहादुर यांनी १७ व्या शतकामध्ये तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध आवाज उठवून धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शिख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक मजबूत झाली. मुघल सम्राटांच्या विरोधात जाऊन भाई लकीशा बंजारा यांनी नववे गुरु तेग बहादूर यांच्या पवित्र शरीरास आपला तांडा व घर जाळून अग्नी दिला. या बाबीस भारतीय इतिहासात अनन्य साधारण महत्त्व आहे.

हिंद दी चादर उपाधीचा अर्थ

गुरु तेग बहादूर यांना हिंद दी चादर (भारताची ढाल) असे आदराने संबोधले जाते. जेव्हा मुघल शासकाच्या अत्याचाराने सीमा ओलांडली होती आणि बळजबरीने धर्मांतर सुरू होते, तेव्हा त्यांनी निधड्या छातीने उभे राहून भारतीय संस्कृतीचे रक्षण केले.

अतुलनीय बलिदान आणि धैर्य

गुरुंना आणि त्यांच्या अनुयायांना दिल्लीत कैद करण्यात आले. त्यांना धर्मांतरासाठी प्रचंड मानसिक आणि शारीरिक त्रास देण्यात आला. मनोधैर्य खचवण्यासाठी त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या तीन प्रिय शिष्यांना क्रूरपणे शहीद करण्यात आले. तरीही, गुरु तेग बहादुरजी आपल्या तत्त्वांवर ठाम राहिले. ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात (आजचे शीशगंज साहिब) त्यांनी शीश दिले, पण आपला धर्म आणि तत्व (सार) सोडले नाही.

गुरु तेग बहादुर शिकवण : निर्भयता

गुरु तेग बहादूर यांची शिकवण आजही तितकीच प्रासंगिक आहे. त्यांनी संदेश दिला: ''भै काहू को देत नहि, नहि भै मानत आन'' (अर्थात: ना कोणाला भीती दाखवा, ना कोणापासून घाबरा.)

त्यांचे बलिदान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नव्हते, तर ते धार्मिक स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे प्रतीक होते.

३५० व्या शहिदी दिनाचे महत्त्व

आज जेंव्हा आपण त्यांचा ३५० वा शहिदी दिवस साजरा करत आहोत, तेव्हा आपण केवळ एका ऐतिहासिक घटनेची आठवण काढत नाही आहोत, तर त्या विचारांना नमन करत आहोत, ज्यांनी भारताचा आत्मा जिवंत ठेवला. आजच्या समाजात जेव्हा द्वेष आणि असहिष्णुता डोकं वर काढते, तेव्हा गुरु तेग बहादुर साहिबजींचा त्याग आपल्याला आठवण करून देतो की, ''दुसऱ्यांच्या हक्कांचे रक्षण करणे, हाच खरा धर्म आहे.''

**–प्रशांत सातपुते**
**जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी**

# हिंद-दी-चादर'च्या जयघोषाने दुमदुमणार नांदेड !

## विद्यार्थ्यांच्या 'प्रभात फेरी'तून आजपासून जनजागृती मोहीम

## चिमुकल्या विजेत्यांचा मुख्य सोहळ्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार सन्मान

**लातूर, (विमाका) :** धर्म, सत्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणारे 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे ३५० वे शहीदी समागम वर्ष ! या ऐतिहासिक पर्वाचे औचित्य साधून, श्री. गुरू तेग बहादूर साहिबजींचा गौरवशाली इतिहास, त्यांच्या त्यागाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न 'प्रभात फेरी'च्या माध्यमातून शिक्षण विभाग करत आहे. प्रभात फेरी गुरूवार पासून (दि.१६ ते २३ जानेवारी) जिल्हाभरातील शाळांमधून निघणार असल्याचे शिक्षण विभागाने सांगितले.




नांदेड येथील आसर्जन परिसरातील (मोदी ग्राउंड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून 'घराघरात आणि मनामनात' हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे विचार रुजविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

विद्यार्थी होणार 'विचारदूत'

केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर कृतीतून इतिहास समजून घेण्यासाठी जिल्हाभरात भव्य प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या हाती असलेले फलक आणि मुखातील जयघोष यामुळे वातावरण भक्तीमय होणार आहे. याशिवाय, २५ जानेवारीपर्यंत सर्व शाळांच्या नित्य परिपाठात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या शौर्यावर आधारित गीतांचे गायन, त्यांच्या जीवनपटाचा (डॉक्युमेंटरी) विशेष शो आयोजित करण्यात येणार आहे.

विजेत्यांना 'सुवर्णसंधी'

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी तालुका, जिल्हास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तालुकास्तरावर १५ ते १७ जानेवारी दरम्यान चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा होतील. जिल्हास्तरीय महाअंतिम फेरी २० जानेवारी रोजी निवडक विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा 'गुरुग्रंथसाहेबजी भवन', सचखंड पब्लिक स्कूलजवळ, हिंगोली गेट, नांदेड येथे पार पडेल. जिल्हास्तरावर विजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव मुख्य सोहळ्यात (२४ व २५ जानेवारी) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येईल. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊनही सन्मानित केले जाईल.

डिजिटल सेवेची साद

हळपववळलहरवरी३५० या ऐतिहासिक सोहळ्याची व्याप्ती वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येत आहे. नागरिकांनी आणि तरुणाईने हळपववळलहरवरी३५० या हॅशटॅगचा वापर करून कार्यक्रमाशी संबंधित पोस्ट, फोटो आणि रिल्स सोशल मीडियावर शेअर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

अधिक माहितीसाठी: कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा सीीीींशसलरहरवींीहरहळवळ.लो या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच शाळांनी अधिक माहितीसाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगार, शिक्षणाधिकारी (योजना) दिलीप बनसोडे, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याशी ीरपरपवशव१सारळश्र.लो या ई-मेलवर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळवले आहे.

# श्री गुरु तेग बहादूर साहिबजी आणि संत नामदेव : भारतीय संत परंपरेतील धर्म, मानवता व बलिदानाचा संगम

नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने श्री गुरू तेग बहादूर साहिबजी आणि संत नामदेव यांच्या भारतीय संत परंपरेतील धर्म, मानवता व बलिदानाचा संगम याविषयी या लेखातून ऊहापोह करण्यात आला आहे.

भारतीय आध्यात्मिक आणि संत परंपरा ही विविध काळात, विविध प्रदेशात जन्मलेल्या थोर विभूतींनी समृद्ध झालेली आहे. या परंपरेत शीख धर्माचे नववे गुरू, हिंद दी चादर म्हणून ओळखले जाणारे श्री गुरू तेग बहादूर साहिबजी आणि महाराष्ट्रातील म्हणजेच हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव येथील वारकरी संप्रदायातील महान संत नामदेव महाराज यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. दोघांचे कार्य, विचार आणि त्याग हे धर्मरक्षण, मानवता, समता आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक मानले जातात.

संत नामदेव महाराज हे १३ व्या-१४ व्या शतकातील महान भक्त संत असून त्यांनी विठ्ठल भक्तीच्या माध्यमातून समाजात समता, नामस्मरण आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला. जात-पात, उच्च-नीच भेद नाकारून त्यांनी सामान्य जनतेला ईश्वरभक्तीचा मार्ग मोकळा करून दिला. त्यांनी रचलेल्या अभंगांमधून मानवता, करुणा आणि सामाजिक ऐक्याचे तत्त्व प्रभावीपणे मांडले




गेले. संत नामदेव महाराजांची कीर्ती महाराष्ट्राच्या सीमांपुरती मर्यादित न राहता उत्तर भारतापर्यंत पोहोचली. त्यांचे अनेक अभंग पंजाबी भाषेत आहेत.

दुसरीकडे, १७ व्या शतकात शीख धर्माचे नववे गुरू श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवाधिकार आणि धार्मिक सहिष्णुतेसाठी अद्वितीय बलिदान दिले. तत्कालिन शासकाच्या धार्मिक अत्याचारांविरुद्ध उभे राहत, त्यांनी काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी प्रसंगी आपले प्राण अर्पण केले. धर्मासाठी शिश कापले गेले, परंतु त्यांनी कधीही अन्यायासमोर शरणागती पत्करली नाही. त्यामुळेच त्यांना हिंद दी चादर ही गौरवपूर्ण उपाधी प्राप्त झाली आहे.

संत नामदेव आणि श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या काळात सुमारे तीन शतकांचे अंतर असले, तरी त्यांच्या विचारांमध्ये मूलभूत समानता आढळून येते. दोघांनीही ईश्वर एकत्व, मानवमूल्ये, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. संत नामदेवांनी भक्तीच्या मार्गाने समाजपरिवर्तन घडविले, तर गुरू तेग बहादूर साहिबजी यांनी त्याग आणि बलिदानाच्या मार्गाने धर्मरक्षणाचा आदर्श निर्माण केला.

विशेष म्हणजे, संत नामदेव महाराजांचे अभंग शीख धर्माच्या पवित्र ग्रंथ गुरुग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. यावरून संत नामदेव यांच्या विचारांचा शीख धर्मपरंपरेवर झालेला प्रभाव स्पष्ट होतो. हा संबंध भारतीय संत परंपरेतील सांस्कृतिक एकात्मतेचे आणि सर्वसमावेशकतेचे उत्तम उदाहरण आहे.

आजच्या काळात श्री गुरू तेग बहादूर आणि संत नामदेव यांच्या विचारांचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. धार्मिक सहिष्णुता, सामाजिक सलोखा, मानवाधिकार आणि नैतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळते. श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांचे बलिदान आणि संत नामदेव यांची भक्तीपर परंपरा ही भारतीय समाजाला एकता, सद्भावना आणि राष्ट्रभावनेच्या दिशेने नेणारी दीपस्तंभ ठरते. त्यामुळे आज त्यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर भारतवर्ष विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबवून त्यांना अभिवादन करत आहे.

**– चंद्रकांत कारभारी, उपसंपादक,**
**जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली**

## हिवाळी संध्याकाळी बनवा पोहा नगेट्स, जाणून घ्या सोपी रेसिपी

क्रिस्पी, चवदार, झटपट आणि पोटभरीचा पदार्थ म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर येते ती नेहमीची भजी, नाश्ता किंवा चटपटीत स्नॅक्स. पण आज आपण पोह्याचा अगदी वेगळा, मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना आवडणारा, पार्टी-योग्य आणि चहासोबत परफेक्ट लागणारा पदार्थ बनवणार आहोत पोहा नगेट्स!बटाट्याची मऊसर चव, पोह्याचा हलकापणा आणि मसाल्यांचा तिखट-आंबट ठसकाष्ठ हे नगेट्स एकदा खाल्ले, की ते तुमच्या घरातला नवा फेव्हरेट स्नॅक बनणार हे नक्की. सगळ्यात भारी गोष्ट म्हणजे हा पदार्थ आपण तषूदनी (उरलेल्या) पोह्यापासून सुद्धा बनवू शकतो. म्हणजेच टेस्टी तर आहेच, शिवाय नो वेस्ट, फुल टेस्ट! हा स्नॅक डीप फ्राय, पॅन फ्राय आणि एअर-फ्रायर या तीनही पद्धतींनी तितक्याच मस्त तयार होतो. त्यामुळे तुम्हाला जेव्हा हवं तेव्हा, जसे हवं तसे, हेल्दी किंवा क्रंची, बनवू शकता. बाहेरून खमंग, आतून मऊ, आणि चटणीत बुडवून तोंडात टाकला की येणारी 'क्रंच-मंच' फिलिंग शब्दात सांगणं कठीण!

चला तर मग, महाराष्ट्राच्या आवडीच्या पोह्याचा ग्लोबल टच घेऊन बनवूया हे मस्त पोहा नगेट्स!

लागणारे साहित्य

जाड पोहा – २ कप
बटाटे (उकडलेले आणि किसलेलेमॅश केलेले) – २ मध्यम
कॉर्नफ्लोअर किंवा तांदळाचं पीठ – ४ टेबलस्पून
हिरवी मिरची – २ बारीक चिरून
आलं – १ टीस्पून किसून
कांदा – १ लहान बारीक चिरलेला
कोथिंबीर – ३-४ टेबलस्पून
लिंबाचा रस – १-२ टीस्पून
हळद – १ टीस्पून
लाल तिखट – १ टीस्पून (चवीनुसार)
गरम मसाला – १ टीस्पून
चाट मसाला – १ टीस्पून
मीठ – चवीनुसार
ड्राय ब्रेडक्रम्स – कोटिंगसाठी
तेल – तळण्यासाठी

कसे बनवायचे नगेट्स?

पोहा पाण्याने धुवून ५-७ मिनिटं बाजूला ठेवा. पाणी पूर्ण निथळू द्या. (पोहा जास्त ओला ठेवू नका)

एका मोठ्या बाऊलमध्ये भिजलेला पोहा, मॅश बटाटा, कांदा, हिरवी मिरची, आलं, कोथिंबीर घाला.

त्यात हळद, लाल तिखट, गरम मसाला, चाट मसाला, लिंबाचा रस आणि मीठ घालून नीट मिक्स करा.

कॉर्नफ्लोअर (किंवा तांदळाचं पीठ) घालून मिश्रण घट्ट पिठाप्रमाणे तयार करा.

जर मिश्रण मऊ वाटलं तर अजून १-२ टेबलस्पून पीठ घालू शकता.

हाताला थोडं तेल लावूनेस्रत्त्हलु आकाराचे किंवा टिक्की सारखे छोटे तुकडे बनवा.

५-१० मिनिटं सेट होण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवलं तर उत्तम.

प्रत्येक नगेट ड्राय ब्रेडक्रम्समध्ये घोळवा आणि हलक्या हाताने दाबून कोटिंग चिकटवा.

कढईत तेल गरम करा. मध्यम-उच्च आचेवर नगेट्स खमंग सोनेरी होईपर्यंत तळा.

बाहेर काढून टिश्यू पेपरवर ठेवा.

'या' टिप्स फॉलो करा

पोहा बारीक केले तर नगेट्स अजून जास्त क्रिस्पी होतात.
बटाट्याऐवजी रताळं वापरून हेल्दी व्हर्जन बनवू शकता.

## फक्त फळच नाही, या झाडाची पानेही औषधी! अनेक गंभीर आजारांवर गुणकारी, सेवन कसे करायचे



आयुर्वेदात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पतींचा उल्लेख आहे, ज्या गंभीर आजारही बरे करू शकतात. लोकं त्यांचा वापर प्राचीन काळापासून करत आहेत. आज आम्ही तुम्हाला औषधी गुणधर्म असलेल्या एका वनस्पतीबद्दल सांगणार आहोत, ज्याचं केवळ फळच नाही, तर पानंही आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. आयुर्वेदात याचा उपयोग अनेक गंभीर आजार बरे करण्यासाठी केला जातो. खरं तर, आपण पपईच्या वनस्पतीबद्दल बोलत आहोत. तिचं फळ आपल्यासाठी फायदेशीर आहे, तसेच तिची पानंही अनेक आजारांमध्ये गुणकारी आहेत.

**पपईच्या पानांचे औषधी गुणधर्म**

डॉ. स्मिता श्रीवास्तव, ज्यांना आयुष औषध क्षेत्रात १० वर्षांचा अनुभव आहे, सांगतात की, पपईमध्ये अल्कलॉइड्स आणि पपेनसारखे महत्त्वाचे पोषक घटक असतात, जे शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्याचं काम करतात. तिच्या पानांमध्ये प्लाझ्मोडिओस्टॅटिक गुणधर्म असतात, जे मलेरियासारख्या रोगांना प्रतिबंध करण्यास मदत करतात. याशिवाय, पपईच्या पानांचं सेवन केल्याने शरीरातील प्लेटलेट्स वाढतात.

**पपईच्या पानांमध्ये अनेक पोषक घटक असतात**

पपईच्या पानांमध्ये अल्कलॉइड्स, पपेन, प्लाझ्म ोडिओस्टॅटिक, फायबर आणि कायमोपपेन यांसारखे अनेक पोषक घटक असतात, जे शरीरासाठी खूप फायदेशीर असतात. त्यांचं सेवन केल्याने केवळ आजार बरे होत नाहीत, तर शरीराला अनेक पोषक घटकही मिळतात. मात्र, तुम्हाला कोणताही गंभीर आजार असेल, तर डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या.

**सेवन कसं करायचं**

डॉ. स्मिता श्रीवास्तव यांच्या मते, पपईची पानं पाण्याने स्वच्छ धुवून ज्युसरमध्ये वाटून घ्या आणि मग त्याचं सेवन करा. यामुळे प्लेटलेट्स वाढतील, तसेच छातीत जळजळ, आंबट ढेकर, अपचन आणि यकृताच्या समस्यांपासून आराम मिळेल. याशिवाय, पपईच्या पानांचं सेवन केल्याने केसांच्या समस्या, पिंपल्स आणि मुरुम यांसारख्या त्वचेच्या समस्याही कमी होतात. ते कोलेस्ट्रॉल नियंत्रित करतात आणि कावीळ, यकृत सिरोसिससारख्या रोगांसाठीही प्रभावी आहेत.

# देशी च्यवनप्राश हिवाळ्यात वारंवार होणारे आजार टाळेल घरगुती रेसिपी

मुंबई : हिवाळा ऋतूमध्ये खोकला, सर्दी आणि अशक्तपणाच्या तक्रारी येतात. मजबूत प्रतिकारशक्ती राखणे अत्यंत महत्वाचे आहे, विशेषतः मुले आणि वृद्धांसाठी. म्हणून, पारंपारिक भारतीय औषध, च्यवनप्राश कसे विसरू शकेल? हो, जर तुम्हालाही बाजारात मिळणारे



भेसळयुक्त च्यवनप्राश खरेदी करण्यास संकोच वाटत असेल, तर आम्ही तुमच्यासाठी घरी बनवण्याची एक सोपी रेसिपी घेऊन आलो आहोत.
बाजारात उपलब्ध असलेल्या च्यवनप्राशमध्ये अनेकदा प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि अतिरिक्त साखर असते, परंतु जर तुम्ही ते घरी बनवले तर तुम्ही त्याची शुद्धता आणि पौष्टिक मूल्य पूर्णपणे नियंत्रित करू शकता. देसी च्यवनप्राशमध्ये ताजे आवळा वापरला जातो, जो व्हिटॅमिन सीचा खजिना आहे. ते केवळ तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते परंतु ते तुमच्या पचन आणि श्वसन प्रणालीसाठी देखील खूप फायदेशीर आहे. विलंब न करता, त्याची सोपी रेसिपी जाणून घ्या. ताजे आवळ- ५०० ग्रॅम देशी तूप, २-३ चम्मच गूळ - ३०० ग्रॅम (स्वादानुसार) मसाले पाउडर वेलची पावडर, १ छोटा चम्मच दालचिनी पावडर१/२ छोटा चम्मच सुंठ पाउडर १/२ छोटा चम्मच पिपली पावडर, १/२ छोटा चम्मच काली मिरची पाउडर १/४ छोटा चम्मच,
पद्धत-प्रथम आवळे नीट धुवा आणि प्रेशर कुकरमध्ये २-३ शिट्ट्या किंवा पूर्णपणे मऊ होईपर्यंत उकळा.
आवळे थंड झाल्यावर, त्यातील बिया काढून टाका . उकडलेले आवळे ब्लेंडर किंवा मिक्सरमध्ये घाला आणि त्यांना जाडसर पेस्टमध्ये बारीक करा. पाणी घालू नका.जाड तळाच्या पॅनमध्ये किंवा कढईत शुद्ध तूप गरम करा. तूप गरम झाल्यावर, आवळा पेस्ट घाला आणि मध्यम आचेवर परतून घ्या. ते हलके तपकिरी होईपर्यंत आणि पॅनच्या बाजू सोडू लागेपर्यंत शिजवा. आवळा पेस्ट चांगली भाजली की, त्यात गूळ किंवा मध घाला. जर गूळ वापरत असाल तर प्रथम ते थोडेसे पाणी घालून वितळवा, गाळून घ्या आणि नंतर ते पेस्टमध्ये घाला. गॅस कमी करा आणि सतत ढवळत राहा जेणेकरून ते जळणार नाही.जेव्हा मिश्रण घट्ट होऊ लागते आणि जामसारखे दिसते तेव्हा सर्व कोरडे मसाले (वेलची, दालचिनी, सुके आले, पिप्पली आणि काळी मिरी पावडर) घाला आणि चांगले मिसळा.च्यवनप्राशसारखे घट्ट होईपर्यंत आणखी ५-७ मिनिटे शिजवा. गॅस बंद करा आणि पूर्णपणे थंड होऊ द्या. थंड झाल्यावर, ते स्वच्छ, कोरड्या काचेच्या भांड्यात ठेवा.

# भारताचा तांदूळ ट्रम्प यांना खुपला..?

**मुकुंद गायकवाड**



भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली खनिज तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलिकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संतापले असावेत. यांनी आता भारताच्या तांदूळ निर्यातीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे.
रशियाकडून भारताने खनिज तेलाची खर-ेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप अमेरिका करत आहे.. .पाश्चात्य देशांनी रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने देऊ केलेल्या स्वस्त किंमतीचा फायदा घेत भारताने रशियाकडून खनिज तेलाची खरेदी केली.अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. यामुळे चिडलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्याला न बधलेल्या भारताची त्यांनी एका नवीन मुद्द्यावरून कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे.
भारताने अमेरिकेत जास्त बासमती तांदूळ निर्यात केल्याचा (डम्पिंग)आरोप करत ट्रम्प यांनी नुकतीच भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डंपिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार भारत असे करू शकत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणार्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल.
भारत, व्हिएतनाम आणि थायलंड आदी देशांमधून होणार्या स्वस्त आयातीमुळे अमेरिकन शेतकर्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किंमती कमी होत आहेत अशी तक्रार अमेरिकन शेतकर्यांनी केली . त्यामुळे अमेरिकेने शेतकर्यांसाठी एका मदत पॅकेजची घोषणा केली होती.भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर (विशेषतः दक्षिण आशियाई समुदायावर) आधारित आहे. भारताने २०२४-२५ या वर्षात अमेरिकेला सुमारे २ लाख ७४ हजार २१३ टन बासमती तांदूळ निर्यात केला. त्याची किंमत सुमारे ३३ कोटी ७० लाख डॉलर्स आहे.धान्य किंवा इतर कृषी उत्पादनांच्या संदर्भात डंपिंग म्हणजे निर्यातदार देश किंवा कंपनीने आपले उत्पादन संबंधित देशांतर्गत बाजारा-तील किमतीपेक्षा कमी दराने विकणे. अशा प्रकरणांत, धान्य आयात करणार्या देशात उत्पादनाची किंमत किंवा उत्पादन खर्च तुलनेने जास्त असतो. (जे शेतीच्या बाबतीत अनेकदा सर्वात प्रभावी स्वरूप असते). वास्तविक, या बातमीने आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची बाजू भक्कम झाल्याचे सहज समजू शकते.
अमेरिकेने दुसर्या महायुद्धानंतर आजवर जगाची अर्थव्यवस्था आपल्या मुठीत ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केली. या संघटनांच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसर्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकर्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत. ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक आयाअत शुल्क लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ निर्यात करतो, हे नक्कीच भूषणावह आहे.
याची दखल माध्यमांनी घेतली पाहिजे.परंतु आर्थिक अभ्यासाअभावी ही महत्वाची बातमी दुर्लक्षित राहिली.
गहू आणि तांदूळ ही दोन्ही पिके अनुक्रमे इजिप्त आणि चीनमध्ये निर्माण झाली होती. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ या क्षेत्रामध्ये उज्ज्वल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरियाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकर्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात. संस्थेमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे शेतकरी तेवढाच शेतमाल उत्पादित करून परदेशांना निर्यात करतात.
इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे, परंतु तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्रायलचा शेतकरी सधन झाला आहे. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डंपिंग करून अमेरिकन शेतकर्यांच्या नाकी नऊ आणले आहेत. डंपिंगबाबत वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की डंपिंग तंत्राचा वापर करून कोणत्याही देशाने दुसर्या देशातील शेतकर्यांचे नुकसान करू नये. ते व्यापार तंत्राच्या विरोधी होईल आणि निषिध्द मानले जाईल. डंपिंगमध्ये एखादा देश दुसर्या देशात इतका शेतमाल निर्यात करतो की दुसर्या देशातील भाव एकदम कोसळून तेथील शेतकर्यांचे अतोनात नुकसान होते. या पार्श्वभूमीवर भरपूर शुल्क लादले गेले असतानाही बासमती तांदूळ इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकेच्या बाजारात कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहन-तीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि डॉ.एम एस स्वामीनाथन यांनी भारतात 'हरित क्रांती'घडवली. त्या आधारे भारत झपाट्याने अन्न धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. अन्नाची आयात करणार्या भारतात ७०च्या दशकात गरजेपेक्षा जास्त धान्य उत्पादन होऊ लागले होते.त्यामुळे ८० व ९०च्या दशकात भारत अन्न धान्याची निर्यात करू लगला. त्या धोरणाची फळे आजच्या शेतकर्यांना चाखायला मिळत आहेत. बासमती तांदळाची वाढती निर्यात तेच दर्शवते.

# पॉक्सो कायद्यात सुधारणा करण्याची काळाची गरज

सर्वोच्च न्यायालयाची सूचना
कायदा समजून घेताना : ॲड. जी.एम. आळंदीकर
बारामती, मो. ९४२३०२०२५५




विधी संघर्षग्रस्त मुलांना त्यांच्या वयाबाबत कोणत्याही टप्प्यावर पुरावे सादर करण्याचे स्वातंत्र्य आहे. शेवटी राज्यघटनेचे अधिकार व विविध खटल्यांचा संदर्भ देऊन उच्च न्यायालयाने चौकशीकामी केलेले आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या या खंडपीठाने रद्द केले असून उच्च न्यायालय जामीन अर्जाची सुनावणी करताना छोटा खटला चालवू शकत नाही, हे स्पष्ट केले.
कौटुंबिक हिंसाचाराचे कलम ४९८ असो, हुंडा प्रतिबंधक कायदा असो व बाल लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा असो याचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याचे अनेकदा अनेक खटल्यांतून स्पष्ट झाले. यासाठी कायद्यातील फक्त तरतुदी उपयोगी नसून यावर उपायांसाठी वकिलांची देखील नैतिक दक्षता अपरिहार्य आहे असे केले व समाजाने संस्थात्मक सुधारणाद्वारे नैतिक जागृती केली, तरच असे खोटे गुन्हे कमी होतील. अन्यथा कायद्यात कितीही सुधारणा केल्या तरी त्या कमी पडतील. बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्याअंतर्गत किशोरवयीन मुले संमतीने संबंध ठेवतात व या कायद्याद्वारे गुन्हे दाखल करतात. त्याला आळा बसावा व अशा मुलांवर कारवाई व्हावी यासाठी रोमिओ ज्युलियटसारखे एखादे कलम या कायद्यात घालून दुरुस्ती व्हावी, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय करोल व न्यायमूर्ती नोंगमीकपम कोटीस्वार यांच्या खंडपीठाने केली आहे.उत्तर प्रदेश राज्य विरुद्ध अनुरुध व इतर २०२६ सी.जे.(एस.सी) ४६ या खटल्यात ९ जानेवारी २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला गेला. अपिलाची थोडक्यात माहिती अशी की, एका १२ वर्षांच्या मुलीला घरातून पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा गुन्हा असलेल्या संशयितांवर मुलीच्या आईने कलम ३६३, ३६६ व बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा (पॉक्सो) कलम ७ व ८ द्वारे गुन्हा दाखल केला. संबंधित व्यक्तीने जामीन अर्ज दाखल केला, त्याचा जामीन अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळल्यावर तो उच्च न्यायालयात गेला. अलाहाबाद उच्च न्यायालयाने जामीन अर्जाची सुनावणी करताना या मुलीचे पोलीस व न्यायालयातील जाब जबाब तसेच शाळेतील कागदपत्रांवर जन्मतारखांचे पुरावे यामध्ये तफावत असल्याने न्यायालयाने जिल्हा मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना आदेश देऊन वैद्यकीय मंडळाद्वारे संबंधित मुलीच्या वयाची तपासणी करण्याच्या सूचना व पोलिसांना चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानंतर केलेल्या चौकशीतून न्यायालयाने जामीन अर्ज मंजूर केला.
उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या विविध खटल्यांचा दाखला देत जामीन अर्जामध्ये सूचना दिल्या. त्यामध्ये पोलिसांनी 'पॉक्सो'अंतर्गत गुन्ह्याची चौकशी करताना फौजदारी प्रक्रिया संहिता १६४ अ व पॉक्सो कायद्याअंतर्गत कलम २७ नुसार योग्य त्या वैद्यकीय कक्षाच्या पुराव्यानुसार मुलीच्या वयाची तपासणी केली पाहिजे असे स्पष्ट केले. त्यानंतर तपास अधिकारी यांनी वयाचा पुरावा दाखल करावा, त्यानंतर जामीन अर्जाची सुनावणी केली जाईल, अशा सूचना दिल्या होत्या. त्यानंतर जामीन अर्ज मंजूर केला.सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारच्या वतीने या जामीन अर्जावर अपील करण्यात आले. प्रामुख्याने या अपिलामध्ये असे न्यायालयाला सांगण्यात आले की, जामीन अर्जाची सुनावणी चालू असताना उच्च न्यायालयाने वयाच्या चौकशीचे आदेश देणे ही बाब चुकीची असून आलेल्या पुराव्यांवर न्यायालयाने जामीन अर्जाची सुनावणी करणे गरजेचे आहे. त्यावर वरील खंडपीठाने बाल लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्याच्या विविध खटल्यांचा ऊहापोह करीत निकालात स्पष्ट केले की, अनेक खटल्यांमध्ये विशेषत बाल न्याय अधिनियम काळजी व संरक्षण कायदा २०१५ द्वारे लहान मुलांच्या संरक्षणासाठी असलेल्या अधिकाराबाबत स्पष्ट केले असून पॉक्सो कायद्यातील कलम २७ नुसार वैद्यकीय तपासणी सर्वप्रथम केली पाहिजे. ती मुलीच्या आई वडिलांसमोर अथवा पालकांसमोर केली पाहिजे. नोंदणीकृत सरकारी दवाखान्यामध्ये अधिकृत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून केली पाहिजे, तिची संमती घेतली पाहिजे. एखाद्या घटनेत मुलीचे वय तिच्या शाळेतील नोंदीपेक्षा वेगळे असेल, तर वैद्यकीय मंडळाद्वारे आधुनिक तंत्राने तिचे वय तपासले पाहिजे. बाल न्याय कायदा २०१५ (बालकांची काळजी व संरक्षण) द्वारे कलम ९४ नुसार मुलीच्या वयाबाबत संशय असेल, तर तिचा जन्मदाखला प्रथम पाहिला पाहिजे. त्यानंतर दहावीचा दाखला किंवा पंचायत अथवा नगरपालिकामधील जन्मदाखला पाहिला जाईल. हे सर्व नसेल तर वैद्यकीयदृष्ट्या तिच्या हाडाची तपासणी करून वय निश्चित केले पाहिजे.अशा प्रकारे कायद्याच्या विविध तरतुदींचा व विविध खटल्यांचा संदर्भ देत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, उच्च न्यायालयाने जामीन अर्जावेळी चौकशीचा आदेश देणे म्हणजे शैक्षणिकदृष्ट्या ते बरोबर असेल; परंतु राज्यघटनेने दिलेल्या कैद्यांच्या अधिकारांसाठी या कलमाचा वापर करता कामा नये. बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा प्रामुख्याने बालकांच्या संरक्षणासाठी वापरला गेला पाहिजे, ही बाब न्यायालयांनी लक्षात घेतली पाहिजे. विधी संघर्षग्रस्त मुलांना त्यांच्या वयाबाबत कोणत्याही टप्प्यावर पुरावे सादर करण्याचे स्वातंत्र्य आहे. शेवटी राज्यघटनेचे अधिकार व विविध खटल्यांचा संदर्भ देऊन उच्च न्यायालयाने चौकशीकामी केलेले आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या या खंडपीठाने रद्द केले असून उच्च न्यायालय जामीन अर्जाची सुनावणी करताना छोटा खटला चालवू शकत नाही हे स्पष्ट केले, तसेच जामीन अर्जाची परिस्थिती पाहून न्यायालयाने केलेला जामीन मंजूरच्या आदेशामध्ये हस्तक्षेप न करता जर यावर पुनर्विलोकन याचिका दाखल झाली, तर सुनावणी करण्यास हरकत नाही असेही स्पष्ट केले. त्याचबरोबर सरकारने अलीकडे किशोरवयीन मुले संमतीने संबंध ठेवतात व सूड उगवण्यासाठी जेव्हा असे गुन्हे दाखल करतात त्यांना शिक्षा करण्यासाठी रोमियो ज्युलेटसारखे कलम या कायद्यात समाविष्ट करून अशा मुलांना शिक्षा देण्याचा कायदा केला पाहिजे. त्यामुळे देखील खोट्या गुन्ह्यांवर आळा बसू शकेल. एकूणच अतिशय महत्त्वपूर्ण टिप्पणी व बाललैंगिक अत्याचार संरक्षण कायद्याचे विश्लेषण करणारा असा महत्त्वपूर्ण निर्णय या अपिलात सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



स्मार्टफोन आल्यापासून रात्री उशीरापर्यंत हातात फोन ठेवणार्यांची संख्या वाढत असून अनेक लोकं टीव्ही किंवा वेब सीरीज बघण्यात वेळ घालवत असतात. हे अगदी सामान्य असलं तरी याने झोपेवर परिणाम होत असल्याचं अनेक शोधात कळून आलेले आहे.या नादात अनेक लोकं तर मध्य रात्रीपर्यंत जागे असतात. परंतू याने नात्यांवर तर परिणाम पडतच आहे पण आता आरोग्यावर देखील दुष्परिणाम दिसून येत आहेत. आपण यावर कधी विचार केला नसेल तर जाणून घ्या की रात्री २ किंवा ३ वाजेपर्यंत न झोपणे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकतं.

## २ Joke विनोद




विक्रेता : एक स्कॉच माणूस आपल्या दुकानात आलाय त्याला १० पैशाचं विष हवंय! आत्महत्या करायची आहे असं म्हणतोय तो त्याला मी कसा वाचवू?
दुकानाचा मालक : त्याला विषाची किंमत १५ पैसे सांग.

## ३ Message संदेश



1-5 yr Girls Love MOM,
6-15 Girls Love DAD
16-25 Girls Love ME
26-50 Girls Love HUSBAND
Ab Bachi
51-80 Girls
Tumhara B To Haq Banta H
Yaar..!!


## ४ Thought सुविचार



झाडांची मुळे मिळेल तेथून ओलावा घेण्यासाठी धडपडत असतात. त्याचप्रमाणे ज्ञानोपासकाची दृष्टी हवी.- **साने गुरुजी**

संस्कृत सुभाषित
**गुरू सुखाचा सागरू । गुरू प्रेमाचा आगरू ।**
**गुरू धैर्याचा डोंगरू । कदाकाळी डळमळी ना ।।**अर्थ - प्रपंचविज्ञान हेच सत्य मानणे याला, ज्ञानेश्वर माऊली अज्ञान म्हणतात. मला म्हणजे भगवंताला सामग्र्याने जाणणे, ते खरे ज्ञान म्हणतात. हे ज्ञान जाणणे, हेच जन्माचे सार्थक, बाकी सारे निरर्थक !

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### पुण्यातील मिहिराने रचला इतिहास, बनली भारतातील सर्वात तरुण वेटलिफ्टर



पुणे -वय लहान पण जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास प्रचंड असला की अशक्य असं काही नाही, याचे जिवंत उदाहरण म्हणजे पुण्याची अवघी सहा वर्षांची मिहिरा गांगुर्डे. स्वत:च्या शरीरापेक्षा अधिक वजन उचलत मिहिराने भारतातील सर्वात तरुण वेटलिफ्टर होण्याचा मान पटकावत क्रीडा क्षेत्रात नवा इतिहास रचला आहे. इतक्या लहान वयात वेटलिफ्टिंगसारख्या कठीण खेळात मिळवलेले हे यश अनेकांसाठी आश्चर्याचा आणि प्रेरणेचा विषय ठरत आहे. मिहिरा रोज नियमितपणे वॉर्मअप, रनिंग, जंपिंग आणि व्यायाम करते. मला हा खेळ खूप आवडतो. मी रोज एक्सरसाईज करते. पुढे जाऊन ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करायचे आहे, असे ती आत्मविश्वासाने सांगते. विशेष म्हणजे, मिहिराला सर्वांचा आवडता अभिनेता अक्षय कुमार याला भेटण्याची संधीही मिळाली असून, त्यामुळे तिचा उत्साह आणखी वाढला आहे.

मिहिराची ही क्रीडा वाटचाल आर. डी. स्पोर्ट्स अकॅडमीपासून सुरू झाली. सुरुवातीला फन अँड फिटनेससाठी ती अकॅडमीमध्ये येत होती. मात्र, तेथील प्रशिक्षकांनी तिची ताकद, शिस्त आणि खेळावरील ओढ ओळखली. तिच्या हालचाली, स्पीड आणि स्टॅमिनामध्ये वेगळेपण दिसत होते. हळूहळू तिची वेटलिफ्टिंगकडे आवड वाढत गेली, असे कोच ऋषी दुबे सांगतात.

कोच दुबे पुढे म्हणाले, आम्ही पाच वर्षांच्या मुलांसाठी फन अँड फिटनेसचे प्रशिक्षण देतो. त्यातून स्पीड, स्ट्रेंथ आणि स्टॅमिना तयार केला जातो. ज्यांच्याकडे अधिक स्पीड आणि ताकद असते, त्यांना योग्य खेळासाठी मार्गदर्शन केले जाते. मिहिराला गेल्या एका वर्षापासून वेटलिफ्टिंगचे प्रशिक्षण देत आहोत. तिने खासदार चषक, झेडपी स्पर्धा आणि देसाई कॉलेज येथे आयोजित स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. मिहिराच्या यशामागे तिच्या पालकांचा मोलाचा पाठिंबा आहे. ती मनापासून सराव करते. पालक म्हणून आम्हाला तिचा अभिमान वाटतो. तिने पुढेही हेच चालू ठेवावे, अशी आमची मनापासून इच्छा आहे, असे तिचे वडील गोविंद गांगुर्डे यांनी सांगितले.

अवघ्या सहा वर्षांच्या मिहिराने दाखवलेली मेहनत, शिस्त आणि ध्येयवेडेपणा आज अनेक मुलांसाठी आणि पालकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# भारताच्या मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर दुटप्पी!

### मोहम्मद कैफ याचे संघ व्यवस्थापनावरही गंभीर आरोप



**नवी दिल्ली :** न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारतीय संघाला एकामागून एक दुखापतींचे धक्के सहन करावे लागत आहेत. रिषभ पंत मालिकेआधीच दुखापतग्रस्त झाला, तर पहिल्या एकदिवसीय सामन्यात वॉशिंग्टन सुंदरला दुखापत झाली. तरीही मुख्य प्रशिक्षक व संघ व्यवस्थापनाने त्याला फलंदाजीला पाठवले आणि त्यांच्या याच निर्णयावर माजी फलंदाज मोहम्मद कैफ संतापला आहे.सुंदरने त्या सामन्यात ७ चेंडूत ७ धावा केल्या होत्या. सामन्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने मालिकेतून माघार घेतली. त्याच्या जागी उर्वरित दोन वन डे सामन्यांसाठी आयुष बडोनीची निवड करण्यात आली. पण, जखमी असूनही सुंदरला फलंदाजी करण्याच्या निर्णयावर राग व्यक्त करताना मोहम्मद कैफने संघ व्यवस्थापन व गौतम गंभीर यांचा दुटप्पीपणा समोर आणला. त्याने शुभमन गिलचे उदाहरण दिले. शुभमन दुखापतग्रस्त झाला तेव्हा गंभीर आणि संघ व्यवस्थापनाने कशा प्रकारने त्याला वाचवले, हे कैफने सांगितले.

'शुभमन गिल दुखापतग्रस्त झाला ते आठवते का, कोलकाता येथे झालेल्या त्या कसोटीत तो फलंदाजीला आला नव्हता. तो मोठ्या धावसंख्येचा सामना झाला होता आणि गिलने २०-३० धावा जरी केल्या असत्या, तर भारताला विजय मिळवण्यास मदत झाली असती, असे लोकांना वाटत होते.

तरीही तो फलंदाजीला आला नाही. त्याची दुखापत आणखी वाढू नये म्हणून त्याला सुरक्षित ठेवले गेले. पण, सुंदरच्या बाबातीत असे का केले नाही? त्यामुळेच सुंदरला फलंदाजीला पाठवण्याचा निर्णय चुकीचा असल्याचे मला वाटते. केएल राहूलसोबत धाव घेताना त्याला आणखी त्रास झाला असता,' असे कैफ म्हणाला.

भारतीय संघाने तो सामना जिंकला असला तरी सुंदरला फलंदाजीला पाठवणे धोक्याचे ठरू शकले असते. तो म्हणाला, तो दुखापतग्रस्त होता आणि तुम्हाला प्रत्येक चेंडूवर फक्त धावा करायच्या होत्या, तर तुम्ही दुसऱ्या एखाद्या खेळाडूला पाठायला हवे होते. एखादा खेळाडू जखमी असताना तुम्ही त्याला फलंदाजीला पाठवून त्याची दुखापत आणखी वाढली असती. चेंडू डीप पॉइंट किंवा स्क्वेअर लेगला गेला, तरी तो दुसरी धाव धावू शकत नव्हता.

तो केवळ एकच धाव घेऊ शकत होता. म्हणून मला वाटते तो चुकीचा निर्णय होता. तुम्ही कुलदीप किंवा दुसऱ्या कोणाला पाठवू शकले असता. जेव्हा परिस्थिती टाळण्यासारखी नसती तर सुंदरला पाठवणे मी समजू शकत होतो, असेही कैफ म्हणाला.

# सिराजच्या गळ्यात कॅप्टन्सीची माळ

### न्यूझीलंडविरुद्धची वनडे सुरू असताना अचानक मोठी घोषणा!



नवी दिल्ली -भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वनडे सीरिज सुरू असताना आता क्रिडाविश्वातून मोठी बातमी समोर आली आहे. मोहम्मद सिराजच्या खांद्यावर कॅप्टन्सीची जबाबदारी सोपवण्यात आलीये. टीम इंडियाचा वेगवान बॉलर मोहम्मद सिराज न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत खास कामगिरी करताना दिसला नाही. अशातच आता त्याच्या खांद्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

मोहम्मद सिराज आता कॅप्टन्सीची जबाबदारी सांभाळताना दिसणार आहे. रणजी ट्रॉफीच्या उर्वरित मॅचेससाठी त्याची हैदराबाद टीमच्या कॅप्टनपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तिलक वर्मा हैदराबादचे नेतृत्व करत होता, मात्र न्यूझीलंडविरुद्धच्या टी२० सीरिजमध्ये त्याची निवड झाल्याने आणि नुकत्याच झालेल्या एका सर्जरीमुळे तो या मॅचेससाठी उपलब्ध नाही.

हैदराबादचा संघ २२ आणि २९ जानेवारी रोजी आपल्या घरच्या मैदानावर मुंबई आणि छत्तीसगडविरुद्ध भिडणार आहे. सिराज २२ जानेवारीला मुंबईविरुद्ध कॅप्टन म्हणून आपल्या कारकिर्दीची पहिली मॅच खेळणार आहे. सिराजने नेहमीच देशासाठी खेळताना लढाऊ वृत्ती दाखवली असून, त्याच्या या अनुभवाचा फायदा हैदराबादच्या तरुण खेळाडूंना होईल, असा विश्वास निवड समितीने व्यक्त केला आहे. निवड समितीचे अध्यक्ष पी. हरी मोहन यांनी सिराजच्या नावावर शिक्कामोर्तब केले. या निवडीसोबतच समितीने अमन राव पेराला याला देखील संघात स्थान दिले आहे, ज्याने विजय हजारे ट्रॉफीमध्ये नुकतेच डबल सेंच्युरी झळकावली होती.

हैदराबादची टीम: मोहम्मद सिराज (कॅप्टन), जी राहुल सिंह (उपकॅप्टन), सीवी मिलिंद, तनय त्यागराजन, के रोहित रायुडू, के हिमातेजा, ए वरुण गौत्रड, एम अभिरथ रेड्डी, राहुल रादेश (विकेटकीपर), अमन राव पेराला, सीटीएल रक्षण रेडी, एन नितिन साई यादव, कनाला नितेश रेड्डी, साई प्रगनय रेड्डी (विकेटकीपर) आणि बी पुन्नैया.



## कोण आहे हेनिल पटेल? पहिल्याच सामन्यात ५ विकेट्स

नवी दिल्ली -अंडर-१९ विश्वचषक २०२६ ला आज १५ जानेवारीपासून दणक्यात सुरूवात झाली आहे. बुलावायो येथे स्पर्धेतील भारताचा पहिलाच सामना अमेरिका अंडर-१९ संघाविरूद्ध खेळवला जात आहे. या सामन्यात भारताच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत अवघ्या १०७ धावांमध्ये अमेरिकेला सर्वबाद केलं आहे. यादरम्यान भारताचा वेगवान गोलंदाज हेनिल पटेल याने ५ विकेट्स घेत महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे, पण हा गोलंदाज नेमका कोण आहे, जाणून घेऊया.

१९ वर्षांखालील विश्वचषकाच्या पहिल्या सामन्यात, भारतीय कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. युवा वेगवान गोलंदाज हेनिल पटेलने भारताचा निर्णय बरोबर असल्याचे सिद्ध करत अमेरिकेच्या टॉप ऑर्डरला माघारी धाडलं. प्रथम फलंदाजी करताना अमेरिकेने फक्त ३९ धावांत ५ विकेट गमावल्या. भारतीय गोलंदाजांनी दमदार सुरुवात केली आणि पहिल्या १० षटकांत फलंदाजांना जास्त धावा करू दिल्या नाहीत. यानंतर हेनिल पटेलने ३५व्या षटकात दोन विकेट्स घेत आपल्या पाच विकेट्स पूर्ण केल्या. हेनिल पटेलने रोज फलंदाजांना क्लीन बोल्ड केलं. तर तिघांना झेलबाद करत विकेट्स मिळवल्या. हेनिलने या सामन्यात ७ षटकांमध्ये १६ धावा देत २.३० च्या इकॉनॉमीने ५ विकेट्स घेतल्या. यादरम्यान त्याने एक मेडन षटकही टाकलं.

कोण आहे पाच विकेट्स घेणारा हेनिल पटेल?

हेनिल पटेल हा मूळचा गुजरात वलसाड येथील आहे. त्याचा जन्म २८ फेब्रुवारी २००७ मध्ये झाला. हेनिल पटेल हा भारतीय अंडर-१९ क्रिकेट संघाचा एक प्रमुख वेगवान गोलंदाज आहे. तो त्याच्या अचूक लाईन आणि लेंग्थसाठी आणि चेंडू दोन्ही बाजूंनी स्विंग करण्याच्या क्षमतेसाठी ओळखला जातो. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याने आपल्या कामगिरीने सर्वांचं लक्ष वेधलं. हेनिलने युवा कसोटीत इंग्लंडविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी केली होती आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारतासाठी उत्कृष्ट कामगिरी कायम ठेवली, ज्यामुळे विश्वचषक संघात त्याचे स्थान पक्कं झालं. हेनिलने गुजरातसाठी देशांतर्गत पातळीवर सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. नवीन चेंडूने विकेट घेण्याची त्याची क्षमता ही त्याची खासियत आहे, जी त्याने आजच्या सामन्यात दाखवून दिली. तो अनेकदा त्याच्या आउटस्विंगर्सने फलंदाजांना त्रास देतो.हेनिल पटेलच्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने अमेरिकेला १०७ धावांवर सर्वबाद केलं. गोलंदाजीशिवाय टीम इंडियाने या सामन्याक कमालीची फिल्डिंग केली आणि एकापेक्षा एक शानदार झेल टिपले, यामुळेच टीम इंडिया अमेरिकेच्या संघाला रोखण्यात यशस्वी ठरली. यासह आता भारताला विजयासाठी १०८ धावांचं लक्ष्य देण्यात आलं आहे.

# भारताचा अमेरिकेवर दणदणीत विजय, अंडर-१९ वर्ल्डकप मोहिमेला विजयाने केली सुरूवात



नवी दिल्ली -भारतीय अंडर-१९ संघाने अमेरिकेविरूद्ध पहिल्या सामन्यात दणदणीत विजय मिळवला आहे. विजयासह टीम इंडियाने मोहिमेला सुरूवात केली आहे. भारतीय संघाने उत्कृष्ट गोलंदाजी करत अमेरिका संघाला १०७ धावांवर सर्वबाद केलं. पावसाने दोन वेळा व्यत्यत आलेल्या सामन्यात टीम इंडियाने डीएलएस पद्धतीनुसार ६ विकेट्सने विजय मिळवला.भारत आणि अमेरिका यांच्यातील सामन्यादरम्यान ढगाळ वातावरण होतं. बुलवायोमध्ये हा सामना खेळवला गेला. भारताच्या डावात पावसाने हजेरी लावली. त्यानंतर ४ षटकांचा सामना झाल्यानंतर पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावली होती, ज्यामुळे सामना बराच काळ थांबला होता. त्यानंतर सामन्याची षटकं कमी करण्यात आल्यानंतर ३७ षटकांचा सामना करण्यात आला. तर भारताला विजयासाठी ९६ धावांचं लक्ष्य देण्यात आलं. हे लक्ष्य संघाने १७.२ षटकांत गाठलं.प्रत्युत्तरात भारतीय फलंदाजदेखील बुलावायोच्या खेळपट्टीवर फार काळ टिकू शकले नाही. बुलावायोच्या खेळपट्टीवर फलंदाजी करणं अवघड होतं. भारताचा आक्रमक फलंदाज वैभव सूर्यवंशी २ धावा करून क्लीन बोल्ड होत माघारी परतला. तर कर्णधार आयुष म्हात्रे १९ चेंडूत १९ धावा करत झेलबाद झाला. तर वेदांत त्रिवेदीदेखील २ धावा करत माघारी परतला. पण विहान मल्होत्रा व अभिज्ञान कुंडू यांनी ४५ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. अभिज्ञान कुंडू ४१ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ४२ धावा करत संघाच्या विजयाचा हिरो ठरलो. तर विहान मल्होत्रा १८ धावा करत बाद झाला. तर कनिष्क चौहान याने १० धावांचं योगदान दिलं. या सामन्याचा सामनावीर भारताचा गोलंदाज हेलिन पटेल ठरला, ज्याने सामन्यात ५ विकेट्स घेतल्या.भारतीय संघाने नाणेफेक जिंकत अमेरिका संघाला फलंदाजीसाठी पाचारण केलं. अमेरिकाचा संघ भारताच्या उत्कृष्ट गोलंदाजी माऱ्यापुढे अवघ्या १०७ धावांमध्ये सर्वबाद झाला. अमेरिका संघाकडून नितीश सुदिनीने ५२ चेंडूत ४ चौकारांसह ३६ धावा केल्या. याशिवाय अमेरिकेचा कोणताच फलंदाज धावा करू शकला नाही. भारताकडून हेनिल पटेलने ५ विकेट्स घेतल्या. याशिवाय दीपेश देवेंद्रन, अंबरिश, खिलान पटेल, वैभव सूर्यवंशी यांनी १-१ विकेट्स घेतल्या.



लॉस एंजेलिस येथे एनबीए नियमित हंगामातील बास्केटबॉल सामन्यादरम्यान लॉस एंजेलिस लेकर्स आणि अटलांटा हॉक्सचे खेळाडू.

# बांगलादेशात मोठा गोंधळ! खेळाडूंचा स्वत:च्या देशात खेळण्यास नकार

ढाका -टी-२० विश्वचषक २०२६ वरून भारत आणि बांगलादेशमध्ये वाद सुरूच आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने टी-२० वर्ल्डकप सामने भारतात न खेळण्याचा निर्णय घेतला आहे आणि आयसीसीला सामन्यांचे ठिकाण बदलत वेळापत्रकात बदल करण्याची विनंती केली आहे, पण आयसीसीने सातत्याने त्यांची विनंती फेटाळली आहे. यादरम्यान बांगलादेशमध्ये नवा वाद सुरू झाला आहे.

बीसीबीच्या वित्त समितीचे अध्यक्ष नझमुल हसन यांनी अलीकडेच त्यांच्या खेळाडूंबद्दल वादग्रस्त विधान केल्याने आता खेळाडूंनी बांगलादेशमध्ये सामने खेळण्यास नकार दिला आहे. जोपर्यंत नझमुल हसन राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत खेळाडू खेळणार नसल्याचं म्हटलं आहे. बांगलादेश क्रिकेटमध्ये तणाव शिगेला पोहोचला आहे. क्रिकेटर्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ बांगलादेश ने बुधवारी एक मोठी घोषणा केली. बांगलादेश क्रिकेटर्स वेल्फेअर असोसिएशन ने बुधवारी एक मोठी घोषणा केली की जर बीसीबी फायनान्स कमिटीचे अध्यक्ष नझमुल हसन यांनी गुरुवारी (१५ जानेवारी) होणाऱ्या पुढील बांगलादेश प्रीमियर लीग सामन्यापूर्वी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला नाही, तर खेळाडू क्रिकेट सामने खेळणार नाहीत. नझमुल हसन यांनी खेळाडूंविरुद्ध कठोर विधान केल्यानंतर ही धमकी देण्यात आली.

जर बांगलादेश २०२६ च्या आयसीसी टी२० विश्वचषकातून बाहेर पडला तर बोर्डाला कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही. खेळाडूंना त्यांचे सामना शुल्क मिळणार नसल्याने त्यांचे नुकसान होईल, असं वक्तव्य त्यांनी केलं. यापूर्वी, नझमुल यांनी माजी कर्णधार तमीम इक्बाल याला ''भारतीय एजंट'' म्हटलं होतं.



म्हणाले, मागणी पूर्ण न झाल्यास...

तमीमने बोर्डाला टी-२० विश्वचषकासाठी भारतात जाण्याच्या निर्णयात सावधगिरी बाळगण्याचा आणि क्रिकेटला प्राधान्य देण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर नजमुलने तो भारताची बाजू घेत असल्याचं म्हटलं.नजमुल हसन यांनी अलिकडेच झालेल्या टी-२० विश्वचषकाबद्दल बोलताना म्हटलं की, ''विश्वचषकात सहभागी न झाल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे कोणतेही नुकसान होणार नाही, तर नुकसान खेळाडूंचे होईल. खेळाडूंना तोटा सहन करावा लागेल कारण त्यांना प्रत्येक सामन्यासाठी सामना शुल्क मिळते. जर एखाद्या खेळाडूने सामन्यात भाग घेतला, सामनावीराचा पुरस्कार जिंकला किंवा विशेष कामगिरी केली तर त्यांना शुल्क दिलं जातं. त्यामुळे आयसीसीच्या नियमांनुसार आणि सामन्यांच्या नियमांनुसार, त्यांना त्यांचा हक्काचे पैसे मिळतात. बांगलादेश वर्ल्डकप खेळो किंवा न खेळो, बोर्डाला कोणताही फायदा किंवा तोटा नाही, किमान या विश्वचषकासाठी तरी नाही.''

खेळाडूंना भरपाई देण्याबाबत चर्चा करताना, त्यांनी रागाने विचारलं, ''आपण त्यांना भरपाई का द्यावी? जर ते कुठेही जाऊन काहीही करू शकत नसतील, तर त्यांच्यावर खर्च केलेले कोट्यवधी रुपये आपण त्यांच्याकडून परत मागावे का? आपण पैसे परत मागावे? मला उत्तर द्या.'' ते पुढे म्हणाले की, बोर्डाशिवाय खेळाडूंना राहणं कठीण होईल. आता याचा विचार करा: जर बोर्ड नसतं तर खेळाडू टिकू शकले असते का? तुम्ही फक्त एकाच दृष्टिकोनातून विचार करत आहात.'' नझमुल हसन यांच्या विधानानंतर, क्रिकेटर्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ बांगलादेश ने ही मोठी घोषणा केली.

# ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत आजपासून विविध उपक्रम

## लातूर जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या ‘प्रभात फेरी’तून जनजागृती मोहीम

**लातूर/प्रतिनिधी:** धर्म, सत्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी बलिदान देणारे ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास, त्यांच्या त्यागाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न शिक्षण विभागामार्फत केला जाणार आहे. यानिमित्त आजपासून जिल्ह्यात शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

‘प्रभात फेरी’च्या माध्यमातून शिक्षण विभाग करत आहे. प्रभात फेरी गुरूवार पासून (दि.१६ ते २३ जानेवारी) जिल्हाभरातील शाळांमधून निघणार आहे. नांदेड येथील आसर्जन परिसरातील (मोदी ग्राउंड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घराघरात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा इतिहास पोहचविण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत २५ जानेवारीपर्यंत सर्व शाळांच्या नित्य परिपाठात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या शौर्यावर आधारित गीतांचे, त्यांच्या जीवनपटावर आधारित डॉक्युमेंटरी दाखविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी तालुका, जिल्हास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरावरील स्पर्धेतील विजेत्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तालुकास्तरावर १७ जानेवारीपर्यंत दरम्यान चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा होतील. जिल्हास्तरावर विजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव नांदेड येथे आयोजित मुख्य सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येईल. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊनही सन्मानित केले जाईल.

३५० या ऐतिहासिक सोहळ्याची व्याप्ती वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येत आहे. नागरिकांनी आणि तरुणाईने ३५० या हॅशटॅगचा वापर करून कार्यक्रमाशी संबंधित पोस्ट, फोटो आणि रिल्स सोशल मीडियावर शेअर




करावेत, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

## शाई पुसून गैरकृत्य करणाऱ्यास पुन्हा मतदान करता येणे शक्य नाही

**मुंबई/प्रतिनिधी:** बोटावर लावण्यात आलेली शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे गैरकृत्य आहे. त्याचबरोबर बोटावरची शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदान करण्यासाठी आल्याचे आढळल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

बोटावरची शाई पुसून कोणी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही, याबाबतची दक्षता यापूर्वीच घेण्यात आली आहे. मतदाराने मतदान केल्यानंतर त्याबाबत नोंद घेण्यात आलेली असते. त्यामुळे केवळ शाई पुसून गैरकृत्य केलेल्या मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही. याबाबत सतर्कता बाळगण्याच्या सूचना पुन्हा एकदा सर्व संबंधिताना देण्यात आल्या आहेत.

मतदाराच्या बोटाला शाई लावण्याकरिता मार्कर पेनच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने १९ नोव्हेंबर २०११ रोजी आणि २८ नोव्हेंबर २०११ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. तेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. या आदेशानुसार मतदाराच्या बोटावर ठळकपणे उमटेल, अशा पद्धतीने मार्कर पेनने शाई लावण्यात यावी; तसेच नखावर आणि नखाच्या वरच्या बाजुला त्वचेवर तीन- चार वेळा घासून शाई लावावी, अशा सूचना यापूर्वी देखील देण्यात आल्या असून आणि त्या मार्कर पेनवरही नमूद केल्या आहेत. त्यामुळे शाई पुसण्याचा प्रयत्न करण्याचे गैरकृत्य करू नये, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

## पाथरवाडीच्या कर्करोग व डोळ्यांच्या तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथे श्री महादेव हनुमान अध्यात्मिक पीठ व रोटरी क्लब लातूर मिटाऊन स्वामी विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटल लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्करोग निदान शिबिर व डोळ्यांच्या तपासणी शिबिरास अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पाथरवाडीच्या श्री महादेव हनुमान अध्यात्मिक पीठच्या वतीने सातत्यानेअशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागातील रुग्णांच्या सोयीसाठी सदर शिबिराचे आयोजन केले गेले. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष अमोल दाडगे, पाथरवाडीचे सरपंच महेश सुडे, कर्करोग तज्ञ डॉ. बाजीराव जाधव, नेत्ररोग तज्ञ डॉ. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात एकूण २८० रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. नेत्र तपासणीत दोष आढळलेल्या ४५ रुग्णांना सोलापूर येथील नेत्र चिकित्सालय रुग्णालयात शस्त्रक्रियासाठी विनामूल्य घेऊन जाण्याची व्यवस्था करण्यात आली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी रमेश मद्दे, पंडितराव मुंढे, दगडू सोमवंशी, कमलाकर सूर्यवंशी, गोरख साळुंखे, जगदीश मद्दे, नवनाथ मद्दे, जगन्नाथ येमले, सौ. शोभा येमले इत्यादींनी परिश्रम घेतले.

## मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ ४ फेब्रुवारीला पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उपस्थिती नोंदणी ऑनलाईन करणेचे आवाहन

**नाशिक/प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत (पदवीप्रदान) समारंभ बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठ मुख्यालयात आयोजित करण्यात आला आहे. त्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी येत्या दिनांक २० जानेवारीपर्यंत आपल्या उपस्थितीची ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.



विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार हा दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला आहे. त्यात सन २०२४-२०२५ या वर्षात (डिसेंबर २०२४, मार्च २०२५ व मे/जून २०२५ ह्या परीक्षांमध्ये) उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. त्यास प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी https://31convocation.ycmou.ac.in/attendance या लिंकवर जाऊन आपल्या उपस्थिती बाबतची माहिती कृपया ऑनलाईन पद्धतीने भरावी. सदरची लिंक ही दिनांक १४/०१/२०२६ ते दिनांक २०/०१/२०२६ या कालावधीत सुरू राहील व या कालावधीतच नोंदणी करता येईल. यास मुदतवाढ मिळणार नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करता येईल. तसेच दीक्षांत समारंभच्या दिवशी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या वेळेत विद्यापीठ मुख्यालयात हजर राहून व अनामत रक्कम रु. ५००/- (पाचशे रुपये) भरून विद्यार्थ्यांना दीक्षांत शाल घ्यावी लागेल. अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने आधी देखील भरता येईल.

अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरणेबाबत तसेच दीक्षांत समारोहासंबंधीची सर्व माहिती समारंभापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28329 या लिंकवर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल. ती विद्यार्थ्यांनी पहावी. पीएच. डी. पदवीसाठी पात्र विद्यार्थ्यांची उपस्थिती गृहीत धरण्यात आलेली आहे. त्यांनी स्वत:च्या उपस्थितीची नोंद करू नये. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या उपस्थिती बाबतची ऑनलाईन स्वीकृती नोंदवली आहे, त्यांनाच दीक्षांत समारोहाच्या दिवशी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. ज्यांनी नोंदणी केलेली नाही, त्यांची प्रमाणपत्रे दीक्षांत समारोहानंतर काही कालावधीत त्यांच्या अभ्यासकेंद्रामार्फत वितरीत केली जातील. त्यासाठी त्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. नोंदणी न करता दीक्षांत समारंभात आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे व परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

## चिमुकल्यांच्या भारुडातून मतदानाचा जागर
### मनपा शाळा क्र. ६ च्या विद्यार्थ्यांकडून लातूर शहरात ‘मतदानाचा बुरगुंडा’ सादर

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाचा टक्का वाढावा, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या मतदार जनजागृती उपक्रमांना लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.हा उपक्रम महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, उपायुक्त पंजाबराव खानसुळे, स्वीप प्रमुख व मनपा शिक्षणाधिकारी श्वेता नागने, शालेय शिक्षण विभागाचे मधुकर ढमाले, सतीश भापकर व सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यात शहरातील चिमुकल्यांनीही मोलाचे योगदान दिले आहे.

मतदान जनजागृती विभाग (स्वीप) यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांतर्गत महानगरपालिका शाळा क्रमांक ६ येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी ‘मतदानाचा बुरगुंडा’ हे प्रभावी भारुड सादर करून नागरिकांना मतदानाचा संदेश दिला. चिमुकल्यांच्या निरागस अभिनयातून, घोषणांतून व संवादांतून लोकशाही प्रक्रियेत सहभागाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.




हे भारुड शहरातील विविध प्रमुख चौकांमध्ये तसेच १८ प्रभागांतील गजबजलेल्या ठिकाणी सादर करण्यात आले. अनेक ठिकाणी नागरिक मोठ्या संख्येने थांबून सादरीकरण पाहताना दिसले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.टाळ्यांच्या गजरात त्यांचे कौतुक करण्यात आले आहे.

या भारुडाचे लेखन सौ. सुमती सोमवंशी यांनी केले असून संपूर्ण सादरीकरणाचे दिग्दर्शन व मार्गदर्शन सहशिक्षक श्री. सतीश साहेबराव चव्हाण यांनी केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे लहान वयातील विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृतीसाठी इतके प्रभावी योगदान मिळाल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

लोकशाही प्रक्रियेत पुढील पिढीचा सहभाग वाढावा, या उद्देशाने अशा प्रकारचे उपक्रम राबविणे महत्त्वाचे असून, भविष्यातही विविध कलाप्रकारांच्या माध्यमातून मतदान जनजागृतीचे कार्यक्रम सुरू राहणार असल्याचे विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट साठी एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील डॉ. पुजा आष्टुरे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी:** येथील एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील एम.पी.टी.एच. मस्सक्युलो स्केलेटल विषयातील व्दितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. पुजा रविंद्र आष्टुरे यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी नुकतीच निवड झाली आहे. राज्यातील शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतून सदरील संशोधनासाठी ही निवड झाली आहे.

गेल्या एप्रिल २०२५ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी राज्यभरातील बी.पी.टी.एच. व एम.पी.टी.एच. फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागवले होते. त्यामध्ये एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी संशोधन कार्यासाठी प्रस्ताव पाठवले होते. यामध्ये २५ पैकी एम.पी.टी.एच. व्दितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. पुजा आष्टुरे या विद्यार्थीनीच्या प्रस्तावाची १२ जानेवारी रोजी निवड करण्यात आली आहे.

या मध्ये ‘‘गुडघ्याच्या ऑस्टिओआर्थ्राइटिस असलेल्या रुग्णांमध्ये फिजिओथेरपीस्टव्दारे हालचाल व स्वत;चा हालचालीस तुलनात्मक प्रभावीपणा: एक यादृच्छिक नियंत्रित चाचणी‘‘ या विषयावर डॉ. पुजा आष्टुरे संशोधन करणार आहेत.



येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत सदरील संशोधन पुर्ण करुन ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहे. या संशोधन कार्यासाठी एमयुएचएसकडून नऊ हजार आठशे एवढे विद्यावेतन मिळणार आहे.

या निवडीबद्दल डॉ. पुजा आष्टुरे यांचे एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य तथा मार्गदर्शक डॉ. सुभाष खत्री, विभाग प्रमुख डॉ. गौरव भटनागर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतून अभिनंदन होत आहे.

## शारदा स्कूलमध्ये जिजाऊ, विवेकानंदांना अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी:** येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंती यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात झालेल्या कार्यक्रमात प्राचार्य लक्ष्मण पुरी यांनी महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी शाळेतील कृष्णा आडगावकर, कृष्णा सांगळे, आराध्या अनमूलवाड, श्रावणी आर्य, दूर्वा बाळे, दिव्या गाडे, हर्षदा गाडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. रोहित जाधव, मेघा शिंदे, शीतल नडगिरे व महेश सोनवणे या शिक्षकांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी शाळेच्या समन्वयिका मानसी पाटील, अश्विनी पवार, वर्षा कांबळे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन रोहिणी कदम यांनी केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# जीवघेण्या नायलॉन मांजाला यशवंत विद्यालयातील विद्यार्थ्यांचा रामराम

**अहमदपूर/प्रतिनिधीः** मकर संक्रांतीचा सण आनंदाने साजरा करताना तो निसर्ग आणि पशुपक्ष्यांसाठी घातक ठरू नये, या उदात्त हेतूने अहमदपूर येथील यशवंत विद्यालयात एक स्तुत्य जनजागृती उपक्रम राबवण्यात आला. विद्यालयाच्या कला विभाग व इको क्लबच्या वतीने विद्यार्थ्यांना प्लास्टिक मांजाचे दुष्परिणाम सांगून, पर्यावरणपूरक पतंग उडवण्याचे आवाहन करण्यात आले.



प्लास्टिक कोटिंग असलेली मांजा अतिशय धारदार व मजबूत असल्याने ती दुचाकीस्वार, पादचारी तसेच लहान मुलांसाठी जीवघेणी ठरत असल्याचे शिक्षकांनी स्पष्ट केले. गळा, हात-पायांवर गंभीर जखमा होऊन अनेक अपघात घडत असल्याचे वास्तव विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. विशेषतः पक्ष्यांसाठी ही मांजा प्राणघातक ठरत असून, उडताना पंखांमध्ये अडकून जखमी होणे किंवा मृत्यू होण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी नो प्लास्टिक मांजा हा संदेश देत सुरक्षित, सुती व पर्यावरणपूरक दोऱ्याचाच वापर करण्याची प्रतिज्ञा घेतली. इको क्लबचे समन्वयक डॉ. शरद करकनाळे व कला शिक्षक महादेव खळुरे यांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. नववीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक, कागदी व पर्यावरणपूरक पतंग साकारून या उपक्रमाला कलात्मक रूप दिले.यशवंत विद्यालयाच्या या उपक्रमातून सण साजरा करताना निसर्ग, पशुपक्षी व मानव सुरक्षित राहणे हीच खरी सणाची भावना आहे असा महत्त्वपूर्ण संदेश समाजाला देण्यात आला.या उपक्रमाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव डी. बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

तुमचा आनंद, कुणाचा तरी जीव घेऊ शकतो नायलॉन मांजा हा अविघटनशील असल्याने तो वर्षानुवर्षे झाडाझुडपांत अडकून राहतो. मकर संक्रांत संपल्यानंतरही हा मांजा निष्पाप पक्ष्यांसाठी फास ठरतो. सणाचा आनंद साजरा करताना आपल्यामुळे पर्यावरणाची हानी होऊ नये, हीच खरी संस्कृती आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पर्यावरणपूरक कागदी पतंग आणि साध्या सुती धाग्याचा (मांजाचा) वापर करून एक सुजाण नागरिक म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी.

पायात मांजा अडकण्याचा धोका प्लास्टिक मांजा जैव विघटनशील नसल्याने ती झाडे, वीजवाहिन्या, इमारती व रस्त्यांवर दीर्घकाळ अडकून राहते. यामुळे परिसर अस्वच्छ दिसतो, प्लास्टिक प्रदूषण वाढते तसेच वीजपुरवठा खंडित होण्यासारख्या समस्या निर्माण होतात. जनावरांच्या पायात मांजा अडकणे किंवा ती गिळल्यास गंभीर दुखापत होण्याचीही शक्यता असते.

**– महादेव खळुरे, कला शिक्षक**

## छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय उदगीर येथे विद्यार्थी परिषदेचे आंदोलन

**उदगीर/प्रतिनिधीः** उदगीर शहरातील छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालयात १२ विच्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा प्रवेश पत्र (हॉल तिकीट) साठी अनावश्यक शुल्क आकारला जात असल्याच्याचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद उदगीर शाखेला विद्यार्थ्यांनी कळवले. याला अनुसरून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राचार्यांना निवेदन देऊन, तसेच त्या विरोधात आंदोलन करून, याचा तीव्र निषेध केला. महाविद्यालय प्रशासनाने संबंधित तक्रारीची दखल घेऊन, आवश्यक शुल्क घेणे बंद केले. व विद्यार्थ्यांच्या कडून अवाजवी शुल्क घेणे तात्काळ थांबवले. या आंदोलनात अभाविप शहर मंत्री सुमित लाल, तसेच महाविद्यालय शाखा सदस्य तसेच शहर कार्यकारणी सदस्य आणि अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवत अभाविपने विद्यार्थ्यांसह महाविद्यालयावर आक्रोश मोर्चा काढून प्रशासनाला जाब विचारला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .रामकिशन मांजरे यांनी प्रशासनाची चूक स्वीकारत संबंधित विद्यार्थ्यांचे शुल्क त्वरित माफ करत असल्याबाबत घोषणा केली. यावेळी अभाविपचे शहर मंत्री सुमित लाल यांनी, ज्या-ज्या वेळी विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, त्या प्रत्येक वेळी अभाविप विद्यार्थ्यांच्या हितासाठी ठामपणे उभी राहते आणि पुढेही उदगीर शहरातील शैक्षणिक व सामाजिक प्रश्नावर विद्यार्थ्यांच्या वतीने आंदोलने करण्यात येतील. असे वक्तव्य केले.

# विभागीय शालेय बेल्ट व मास रेसलिंग क्रीडा स्पर्धा लातूर येथे उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधीः** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि रुरल अँड अर्बन ट्रॅडिशनल रेसलिंग असोसिएशन, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय शालेय ट्रॅडिशनल बेल्ट व मास रेसलिंग क्रीडा स्पर्धा १४ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा क्रिडा संकुल येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

नांदेड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील खेळाडू या विभागीय स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेतील अनेक लढती रंगतदार ठरल्या. तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार तथा 'माझं लातूर' परिवाराचे प्रमुख सतीश तांदळे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी तांदळे यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत लातूर विभागाने राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त पदके जिंकावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड यांनीही खेळाडूंना मार्गदर्शन करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे आयोजन कराड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तज्ञ पंचांच्या निरीक्षणाखाली लढती यशस्वीरित्या पार पडल्या.



मास रेसलिंग आणि बेल्ट रेसलिंग या दोन प्रकारांत स्पर्धा झाल्या. सामनाधिकारी म्हणून रुरल अँड अर्बन ट्रॅडिशनल रेसलिंग असोसिएशनचे अध्यक्ष खय्युम तांबोळी, सचिव तथा राष्ट्रीय खेळाडू के. वाय. पटवेकर, नांदेड जिल्हा ट्रॅडिशनल रेसलिंग असोसिएशनचे सचिव व राष्ट्रीय पंच बालाजी गाडेकर यांनी जबाबदारी सांभाळली. राष्ट्रीय पंच विक्रम गायकवाड, सलोनी सुरदशे, ट्रॅडिशनल रेसलिंग अँड पँक्रेशन असोसिएशन, धाराशिवचे सचिव राहुल अंबुरे, शुभम बोडके यांनी पंच म्हणून काम पाहिले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून किरण कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार संजय स्वामी, अजमेर शेख, प्रा.जितेंद्र जाधव, उल्हास डोलारे उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभम बोडके, रेसलिंग कोच चेतन जावळे, शुभम बालूरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विक्रम गायकवाड यांनी केले तर आभार के. वाय. पटवेकर यांनी मानले.

## विद्यापीठ नामांतरासाठी लढा अन्यायाविरुद्ध बंडाची ज्वाला:डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी

**अहमदपूर/प्रतिनिधीः** विद्यापीठ नामांतर लढ्याचा वर्धापन दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसून तो अन्यायाविरोधातील ऐतिहासिक बंडाची ज्वाला पुन्हा पेटवणारा दिवस आहे, असे प्रतिपादन डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. अहमदपूर येथे सम्राट मित्र मंडळाच्या वतीने आयोजित संघर्ष स्मृती अभिवादन' कार्यक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे होते.

डॉ. सूर्यवंशी पुढे म्हणाले की, नामांतराचा हा लढा दलित-बहुजन समाजाच्या स्वाभिमान आणि घटनात्मक हक्कांसाठी दिलेला अभूतपूर्व संघर्ष होता. हजारो कार्यकर्त्यांच्या त्यागातून आणि बलिदानातून हा विजय मिळाला आहे. हा विजय भीक म्हणून मिळालेला नसून तो संघर्षातून हिसकावून घेतलेला अधिकार आहे. आजच्या काळात समता आणि सामाजिक न्यायावर वार होत असताना, नामांतर लढ्याचा हा धगधगता इतिहास नव्या पिढीने स्मरणात ठेवणे काळाची गरज आहे.यावेळी माजी नगरसेवक शेषेराव ससाणे, सावन कदम, अरुणभाऊ वाघंबर, बजरंग गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन सम्राट मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केले होते.

नामांतर लढा' संघर्ष भविष्याला दिशा देणारा नामांतर लढ्यातील शहिदांना अभिवादन करताना डॉ. सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले की, हा लढा केवळ भूतकाळातील घटना नाही, तर तो वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याला इशारा देणारा ऐतिहासिक संघर्ष आहे. हजारो भीमसैनिकांनी सोसलेल्या हालअपेष्टा आणि सांडलेले रक्त यातूनच विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव मिळाले. हा स्वाभिमानाचा वारसा जपण्यासाठी समाजाने सदैव जागृत आणि संघटित राहणे आवश्यक आहे.

## विमलाबाई देशमुख कन्या शाळेमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी



**उदगीर/प्रतिनिधीः** विमलाबाई देशमुख कन्या शाळेमध्ये आज दिनांक १२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा ॲडव्होकेट सौ पूजा वैभव रेड्डी व योगशिक्षिका कलावती शिवमूर्ती भातांबरे उपस्थित होत्या. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सन्माननीय कोयले एस ए मॅडम यांनी प्रतिमेचे पूजन केले. तसेच सर्व अध्यापक अध्यापिका प्रमुख पाहुणे शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी संसदेची सचिव यांनीही प्रतिमेचे पूजन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका सन्माननीय कोयले एस ए मॅडम होत्या तर प्रमुख पाहुण्या सौ पूजा रेड्डी व सौ कलावती भातांबरे होत्या. गीत मंचातील विद्यार्थिनींनी शब्दसुमनांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. याप्रसंगी इयत्ता पाचवी ची वेदिका मुंढे व इयत्ता आठवीची वैभवी जंगले या विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ यांच्या व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची ओळख करून दिली.

इयत्ता सहावी ची विद्यार्थिनी जानवी गोरटे ही राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेमध्ये आली आणि तिने सुद्धा जिजाऊंच्या कार्याचे ओळख करून दिली. प्रमुख पाहुण्या कलावती भातांबरे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

सर्व विद्यार्थिनींना राजमाता जिजाऊ सारखे बनण्याचे आव्हान केले. इनरव्हील क्लब कडून शाळेला मैदानावर अंथरण्यासाठी पाच चटया दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमान पॅड सीबी यांनी केले व आभार श्रीमती रेड्डी यु एम यांनी मांडले.

## गावाला रस्ता नाही, उमेदवारांना निवडणुकीत फिरकू देणार नाही; उदगीर तालुक्यातील चोंडीकरांचा जि. प. मतदानावर बहिष्काराचा निर्णय

**उदगीर/प्रतिनिधीः** तालुक्यातील चोंडी ते चोंडी तांड्यादरम्यान रस्त्याअभावी नागरिकांचे मोठे हाल होत आहे. याकडे लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे पुर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. यामुळे घोषित झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदानावर बहिष्कार टाकत असल्याचा इशारा नागरिकांच्या वतीने निवेदनाद्वारे बुधवारी (१४ जानेवारी) तहसीलदार उदगीर राम बोरगावकर यांना देण्यात आला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चोंडी ते चोंडी तांडा हा शेतकऱ्यांच्या वादात असलेला रस्ता तहसीलदार उदगीर यांच्या मदतीने गेल्या वर्षी दोन्ही शेतकऱ्यांच्या सहमतीने खुला करून दिला होता. तसेच त्या रस्त्याची दुर्दशा स्वतः तहसीलदार यांनी भेट देऊन पाहणी केली. ग्रामस्थांना पावसाळ्यात तर नाहक त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्यात या गावाचा इतर गावांपासून संपर्क तुटतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही होते.

हे गाव विकासापासून कोसो दूर राहिल्याने निवडणूकीत कोणत्याही राजकीय पक्षाच्या उमेदवारांना फिरकू देणार नाही, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर माजी सरपंच बाबू पवार, किशन पवार, परशुराम पवार, गोविंद पवार यांच्यासह दीडशे ते दोनशे नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. नागरिकांनी माजी आमदार सुधाकर भालेराव यांना व माजी मंत्री आमदार संजय बनसोडे बनसोडे यांना अनेकवेळा निवेदन देऊनही काहीही न्याय मिळाला नाही. त्यामुळे तांडावासीयांनी आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

## हवा हवासा ..

यश देणार अवचित
कधी जोरदार झासा
अपयश मूळ कारण
कधीतरी रे अभ्यासा

खुलेआमआरोपांचा
कुणी दिला रे व्हिसा
सत्य कळणारं कधी
कुणाचा गरम खिसा

कसेआपण हरलो रे
कशी नाही जिज्ञासा
दुजांनादोषी ठरवता
आधीपहावा आरसा

पिंज-या अडकू दुजा
सोडे सुटका उसासा
बिनदिक्कत बाकीचे
पकडे छोटासा मासा

नावे ठेवावी यंत्रणेला
ओढूताणून नसानसा
कोण घेणार शोध तो
अंतरात्मा आहे कसा

प्रश्न सुटणारंबराचसा
सतर्क राहता जरासा
पर्याय ना मेहनतीला
जिंकावा जन भरोसा

सत्ते विना जगून पहा
तळ ना सत्ता हव्यासा
वृद्धिंगत हो जन स्नेह
तू वाटावा हवाहवासा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# झेडपीचे बिगुल वाजताच जळकोट तालुक्यात निवडणूक यंत्रणा सज्ज

## तहसीलदार राजेश लांडगे यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

**जळकोट/प्रतिनिधीः** जिल्हा परिषदेसह पंचायत समितीच्या निवडणुकीची निवडणूक आयोगाने घोषणा केली असून येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान घेण्यात येणार आहे. निवडणुकीचे बिगुल वाजताच तालुक्यात निवडणूक यंत्रणा सक्रिय झाली आहे. तहसीलदार राजेश लांडगे यांनी तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी यांची तातडीची बैठक तहसील कार्यालयात घेऊन निवडणूकीच्या दृष्टीने पूर्वतयारीचा आढावा घेतला.

निवडणूक आचारसंहिता लागू झाली असल्याने आचारसंहितेची तालुक्यात प्रभावी अमलबजावणी होण्यासाठी सतर्क राहावे असे निर्देश तहसीलदार राजेश लांडगे यांनी अधिकारी व कर्मचारी यांना दिले. शौचालय, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, रॅम्प, सुरक्षा भिंत इत्यादी सोयी सुविधायुक्त खोल्या मतदान केंद्रासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



अधिकारी - कर्मचारी नियुक्ती, अधिकारी - कर्मचारी निवडणूक प्रशिक्षण, व्हीडीओग्राफी सर्व्हेलियन्स पथक, भरारी पथक, चेक पोस्टसाठी पथक, तक्रार निवारण कक्ष याचे नियोजन करण्यात आले. निवडणूक खर्च अहवाल दाखल करणे, स्ट्राँगरुम, मतमोजणी कक्ष यांच्यासाठी इमारतीची पाहणी करण्यात आली. मतदानाची टक्केवारी अधिकाधिक वाढावी यासाठी मतदार जनजागृती व शिक्षण यावर भर देण्यात यावा, असे निर्देश यावेळी तहसीलदार राजेश लांडगे यांनी उपस्थित अधिकारी - कर्मचारी यांना दिले.

तहसील कार्यालय प्रांगणात असलेल्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमध्ये स्ट्राँगरुम, मतमोजणी व निवडणूक यंत्रणा कक्ष स्थापन करण्याच्या दृष्टीने तहसीलदार राजेश लांडगे व संबंधित अधिकारी यांनी संपूर्ण इमारतीमध्ये फिरुन पाहणी केली.

या बैठकीस नायब तहसीलदार रंगनाथ कराड, नायब तहसीलदार सुहास मुळजकर, पुरवठा निरीक्षण अधिकारी अर्पण राऊत, मंडळ अधिकारी हंसराज जाधव, ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद सूर्यवंशी, ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे सचिव अतीक शेख, ग्राम महसूल अधिकारी कुंदन लोखंडे, नागेश हारणे, बाळेराज बर्गे, महादेव पाटील, बाळासाहेब बोईनवाड, आकाश पवार, परशुराम जानतिने, लक्ष्मण अटकळे, प्रसाद पाटील, भावना भेंडेकर, महसूल सहाय्यक देशमुख, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुधाकर बुक्के, नारायण रेणकुंटवार, डाटा आपरेटर अलीम शारवाले, माधव सातापुरे, कोंडिबा गवळे यांची उपस्थिती होती.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
धाम्सरप्लेड ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एलर/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६